सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. १७ मे २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ४५ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भारत जगभरात करणार पाकिस्तानचा भंडाफोड; सर्वपक्षीय खासदार सत्य मांडणार

नवी दिल्ली, १६ मे : पहलगामपासून ऑपरेशन सिंदूरपर्यंत पाकिस्तान सतत खोटे बोलत आहे. पाकिस्तानचे खोटेपणा उघड करण्यासाठी, भारताने सर्वपक्षीय शिष्टमंडळ जगभरात पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. हे शिष्टमंडळ वेगवेगळ्या देशांमध्ये पाकिस्तानचा भंडाफोड करेल. भारतीय शिष्टमंडळात सर्वपक्षीय ३० खासदार असतील आणि हे शिष्टमंडळ १० दिवस जगातील विविध देशांना भेटी देऊन सत्य मांडतील.

पहलगाम हल्ल्यापासून ते ऑपरेशन सिंदूरपर्यंत पाकिस्तान सतत्याने खोटे बोलत आहे. तो जगाला एक बनावटी कथा सांगत आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानला कोणताही मोठा पाठिंबा मिळालेला नाही, परंतु चीन आणि तुर्कीसारख्या देशांनी त्याला पाठिंबा दिला आहे. पाकिस्तानचा हा खोटारडेपणा भारताला उघड करायचा आहे. त्यासाठी राजकिय पातळीवर, भारत सरकारने विविध देशांना भेट देण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळ पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. शिष्टमंडळात किती खासदार जाणार आहेत हे अद्याप निश्चित झालेले नाही, परंतु असे मानले जाते की शिष्टमंडळात ३० पेक्षा जास्त खासदार जाऊ शकतात. हे खासदार सरकारने ठरवलेल्या देशांच्या विविध ब्लॉक्सना १०



दिवसांसाठी भेट देतील. खासदार त्यांच्या राजकीय मोहिमेवर जाण्यापूर्वी परराष्ट्र मंत्रालय त्यांना माहिती देईल.

या शिष्टमंडळात भाजप, काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, राष्ट्रवादी काँग्रेस (सपा), जेडीयू, बीजेडी, सीपीआय(एम) आणि इतर काही पक्षांचे खासदार असतील. त्यांना २२ ते २३ मे दरम्यान प्रवासासाठी तयार राहण्यास सांगण्यात आले आहे आणि परराष्ट्र मंत्रालय त्यांच्याशी संपर्क साधून प्रवास कार्यक्रमासह आवश्यक तपशील प्रदान करेल, असे एका पथक प्रमुखाने सांगितले.

या शिष्टमंडळात भाजपकडून माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर आणि ओडिशाच्या भाजप खासदार अपराजिता सारंगी यांचा समावेश आहे. तर काँग्रेसचे ४ खासदारही शिष्टमंडळाचा भाग असतील. यामध्ये काँग्रेस खासदार शशी थरूर, मनीष तिवारी, सलमान खुर्शीद आणि अमर सिंह यांचा समावेश आहे. तृणमूल काँग्रेसचे सुदीप बंदोपाध्याय, जेडीयूचे संजय झा, बीजेडीचे सस्मित पात्रा, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे, द्रमुकच्या के कनिमोझी, सीपीआय (एम)चे जॉन ब्रिटास आणि एआयएमआयएमचे असदुद्दीन ओवेसी देखील या शिष्टमंडळाचा भाग असू शकतात.

शिष्टमंडळ पाठवण्याबाबत काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले की, केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी या संदर्भात काँग्रेस अध्यक्षांशी चर्चा केली आहे. पंतप्रधानांनी पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर यावरील २ सर्वपक्षीय बैठकांचे अध्यक्षपद नाकारले. पंतप्रधानांनी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यास सहमती दर्शविली नाही. आम्ही एकतेचे आवाहन करूनही, पंतप्रधान आणि त्यांचा पक्ष काँग्रेसची बदनामी करत आहेत.

जयराम रमेश म्हणाले की, आता अचानक पंतप्रधानांनी पाकिस्तानकडून होणाऱ्या दहशतवादाबाबत भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी परदेशात बहुपक्षीय शिष्टमंडळ पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस नेहमीच सर्वोच्च राष्ट्रीय हितासाठी भूमिका घेते आणि भाजपप्रमाणे कधीही राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यांचे राजकारण करत नाही. काँग्रेस निश्चितच शिष्टमंडळाचा भाग असेल अशी ग्वाही जयराम रमेश यांनी दिली.

# 'ऑपरेशन सिंदूर' अजून संपलेले नाही- राजनाथ सिंह

भुज, १६ मे : 'ऑपरेशन सिंदूर' अजून संपलेले नाही. हा फक्त ट्रेलर होता, वेळ आल्यावर जगाला संपूर्ण पिक्चर दाखवू असे प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केले. गुजरातच्या भुज एअर बेसवर जाऊन जवानांचे कौतुक करताना राजनाथ सिंह बोलत होते.

याप्रसंगी संरक्षण मंत्री म्हणाले की, भारतीय हवाई दलाची पोहोच पाकिस्तानच्या प्रत्येक कोपऱ्यापर्यंत असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. भारतीय विमाने सीमा न ओलांडता पाकिस्तानच्या प्रत्येक कोपऱ्यात मारा करण्यास सक्षम आहेत. भारतीय वायुसेनेने कशा पद्धतीने पाकिस्तानात ९ ठिकाणी हल्ला केला हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. 'जितक्या वेळेत एखादा माणूस नाश्ता करतो तितक्या वेळेत वायुसेनेने शत्रुला टार्गेट केले आहे. भारतीय हवाई दलाने अवघ्या २३ मिनीटात पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे ९ तळं उध्वस्त केलीत. ऑपरेशन सिंदूर'दरम्यान भारतीय वायुसेनेने केलेल्या कारवाईचा सर्व भारतीयांना अभिमान असल्याचे राजनाथ यांनी सांगितले. भारतीय वायुसेनेच्या हल्ल्यात पाकिस्तानातील नष्ट झालेले दहशतवाद्यांचे अड्डे आणि नेटवर्क पुन्हा उभारण्याचे पाकिस्तानचे प्रयत्न सुरू आहेत. पाकिस्तान सरकारने जैश-ए-मोहम्मदचा म्होरक्या मसूद



अजहरला १४ कोटी रुपयांची मदत करणार असल्याचे राजनाथ यांनी सांगितले. पाकिस्तानकडून दहशतवाद्यांना कशी मदत दिली जात आहे, याकडे राजनाथ यांनी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे (आयएमएफ) लक्ष वेधले. तसेच आयएमएफच्या मदतीचा वापर करून दहशतवाद्यांना पाकिस्तान कशा पद्धतीने पायाभूत सुविधा देतोय यावर देखील संरक्षण मंत्र्यांनी भाष्य केले.

मुरिदके येथील लश्कर-ए-तोयबाचे आणि बहावलपूर येथील जैश-ए-मोहम्मदचे अड्डे उद्धस्त करण्यात आले आहेत. ते पुन्हा बांधण्यासाठी आर्थिक मदत करण्याची घोषणा पाकिस्तान सरकारने केली आहे. आंतरराष्ट्रीय निधीकडून येणाऱ्या एक बिलियन डॉलर्सच्या (८५०० कोटी रुपये) मदतीपैकी काही पैसा दहशतवाद्यांचे अड्डे बांधण्यासाठी वापरले जाणार आहे. मग ही आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून अप्रत्यक्षपणे दहशतवाद्यांना मदत नाही का..? असा सवाल राजनाथ सिंह यांनी आयएमएफला केला आहे.

## अकोले तालुक्यात सलग पाचव्या दिवशी अवकाळी पावसाची जोरदार हजेरी

अकोले : अकोले तालुक्यातील बहुतांश भागात सलग पाचव्या दिवशी अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे अनेक ठिकाणी रस्त्यावर व शेतात पाणीच पाणी साठले होते.अकोले शहर व परिसरात दुपारच्या वेळी एक ते दीड तास जोरदार पाऊस पडला.आढळा व प्रवरा विभागात सर्वदूर धुव्वाधार पाउस कोसळला.

आढळा विभागातील समशेरपुर ,टाहाकारी, सावरगाव पाट,देवठाण, तांभोळ,विरगाव, पिंपळगाव निपाणी,हिवरगाव ,डोंगरगाव ,गणोरे, या गावासह प्रवरा पट्ट्यातील विठे ते कळस पट्ट्यातील सर्व गावांतही दुपारी धो- धो पाऊस कोसळला.

# डॉ. मोहन भागवत रविवार पासून नाशिकमध्ये
## संघ शिक्षा वर्गात शिक्षार्थींना करणार मार्गदर्शन

नाशिक - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत येत्या १८ ते २० मे दरम्यान नाशिक येथे येत आहेत यावेळी नाशिक येथे आयोजित संघ शिक्षा वर्गात ते मार्गदर्शन करणार आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम क्षेत्राचा 'कार्यकर्ता विकास वर्ग- प्रथम' (सामान्य) १८ ते ४० वर्ष या वयोगटातील तरुण स्वयंसेवकांचा प्रशिक्षण वर्ग ११ मे पासून सुरू झाला आहे. या वर्गात शिक्षार्थींना मार्गदर्शन करण्यासाठी पू. सरसंघचालक यांचे १८ मे रोजी दुपारी ३.३० वाजता शिर्डी येथील विमानतळावर आगमन होणार आहे.शिर्डी येथे साई मंदिरात साईबाबांचे दर्शन घेऊन ते नाशिकला रवाना होणार आहे.



सायंकाळी ६ वाजता त्यांचे नाशिक येथे आगमन होईल. येथील भोसला सैनिकी विद्यालयाच्या परिसरात या वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

१८ ते २१ मे पर्यंत सरसंघचालक या वर्गस्थानी मुक्कामी असणार आहेत. २१ मे रोजी सायंकाळी ६ वाजता ते पुढील प्रवासास मार्गस्थ होतील. या दरम्यान त्यांचे कोणतेही जाहीर कार्यक्रम असणार नाहीत.

येत्या १ जून पर्यंत चालणाऱ्या या वर्गात महाराष्ट्र, गोवा आणि गुजरात या तीन राज्यातून म्हणजे संघ रचनेतील विदर्भ, देवगिरी, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, गुजरात आणि सौराष्ट्र अशा सहा प्रांतातील २८० स्वयंसेवक सहभागी झालेले आहेत. यात शेतकरी, लघुउद्योजक, डॉक्टर्स, वकिल, व्यापारी, शिक्षक आदिंसह उच्च महविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले आहेत या वर्गात सहसरकार्यवाह कृष्णगोपालजी, अ.भा. कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी हे ही मार्गदर्शन करणार आहेत.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नियमित प्रशिक्षणाचा भाग असलेले असे संघ शिक्षा वर्ग दरवर्षी मे महिन्यात भारतभर सर्वत्र होत असतात.

# तरुणाचा गिरणा नदीत पाय घसरून दुर्देवी मृत्यू

जळगाव, १६ मे : म्हशींना पाणी पाजण्यासाठी गेलेल्या २५ वर्षीय तरुणाचा गिरणा नदी पात्रातील डोहात पाय घसरून पडल्याने दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पाचोरा तालुक्यातील माहेजी येथील आकाश राजेश यादव (वय २५) हा तरुण दुपारी २ वाजेच्या सुमारास माहेजी गावाजवळील गिरणा नदी पात्रात असलेल्या डोहात म्हशींना पाणी पाजण्यासाठी गेला होता.

दरम्यान आकाश यादव याचा अचानक पाय घसरून आकाश पाण्यात पडला. आकाश यास पोहता येत नसल्याने आकाशचा पाण्यात बुडुन मृत्यू झाला. आकाश घरी न परतल्याने आकाशच्या भावाने शोध घेतला असता आकाश याचा मृतदेह गिरणा नदी पात्रातील डोहात आढळुन आला. आकाश यास तात्काळ पाचोरा ग्रामीण रुग्णालयात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत आकाश याच्या पश्चात्य वृद्ध आई, वडिल, एक भाऊ असा परिवार आहे. अत्यंत मेहनती व शांत स्वभाव असलेल्या आकाशचे अकस्मात निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे.

# नागपुरात लवकर सुरु होणार बाईक टॅक्सी! व्यवसाय करणाऱ्यांसाठी परवाना अनिवार्य

नागपूर : एक लाख लोकसंख्या असलेल्या सर्व शहरांमध्ये दुचाकी टॅक्सी सेवा सुरु करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे.त्यामुळे आता नागपुरातही बाईक टॅक्सी सुरु होणार आहे.या बाइक इलेक्ट्रिक राहणार असून त्यावर पिवळा रंग असणार आहे. चालकाचे वय २० वर्षांहून अधिक व ५० वर्षांपेक्षा कमी असावे आदी नियमही घालून देण्यात आले आहे.

ज्याला बाइक टॅक्सीचा व्यवसाय करायचा आहे त्या ॲग्रीगेटरकडे किमान ५० इलेक्ट्रिक बाइक असणे आवश्यक आहे. त्याला राज्य परिवहन प्राधिकरण यांच्याकडून एकच परवाना देण्यात येणार आहे. या परवान्याची वैधता ५ वर्षाची असेल. सर्व बाइक पिवळ्या रंगात असाव्यात आणि त्यावर बाइक-टॅक्सी असे लिहिणे, दुचाकी-टॅक्सीवर सेवा-प्रदात्याचे नाव आणि संपर्क क्रमांक लिहिणे आवश्यक राहणार आहे. बाइक टॅक्सी चालकाकडे बेंज



असण्यासोबतच चालकाचे वय २० वर्षापेक्षा कमी आणि ५० वर्षापेक्षा जास्त नसण्याची अट आहे. त्यामुळे या व्यवसायात तरुणांची संख्या वाढणार आहे. सोबतच दरदिवशी दुचाकी चालविण्याकरिता ८ तासांची मर्यादा असणार आहे.

प्रवाशांसाठी सुरक्षा

प्रवाशांचा सुरक्षतेसाठी बाइक टॅक्सीमधून एकावेळी एकाच प्रवाशाला घेऊन जाता येणार आहे. १२ वर्षाखालील मुलांना प्रवासाकरिता परवानगी नसेल. महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व बाइक टॅक्सींना प्रवासी आणि चालक यांच्यामध्ये विभाजक बसविण्यात येतील. जीपीएस ट्रेकिंग, संकटकालीन संपर्क सुविधा, वेग पडताळणी, दुचाकी चालक आणि प्रवासी यांकरिता हेल्मेट बंधनकारक असेल. अपघात आणि मृत्यू या दोन्हींकरिताचे विमा संरक्षण सेवा प्रदात्याने उपलब्ध करून देणे बंधनकारक असणार आहे.

लवकरच दर ठरवणार

काही कालावधीनंतर महिला चालकांचे प्रमाण टप्प्याटप्याने वाढवून ते ५० टक्के करण्याची जबाबदारी परवानाधारकाची राहणार आहे. बाइक टॅक्सीकरिता परवानाधारकाने दुचाकी-टॅक्सी स्थानक, चढण्याचे आणि उतरण्याचे ठिकाण दर्शवणे आवश्यक राहणार आहे. बाइक टॅक्सीच्या दराचे नियंत्रण संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून करण्यात येईल. त्यामुळे लवकरच दर ठरविण्यात येईल.

# पाकिस्तानवर लक्ष ठेवण्यासाठी उपग्रह अंतराळात पाठवणार

श्रीहरिकोटा : तणावाच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी भारत रविवारी एक उपग्रह अंतराळात पाठवणार आहे. पीएसएलव्ही - सी ६१ रॉकेटमधून हा उपग्रह अंतराळात पाठवला जाणार आहे. हे पीएसएलव्हीचे ६३ वे आणि इस्रोच्या रॉकेटचे १०१ वे प्रक्षेपण आहे. इस्रोच्या नियोजनानुसार रविवार १८ मे रोजी सकाळी पाच वाजून ५९ मिनिटांनी श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून पीएसएलव्ही - सी ६१ रॉकेटचे प्रक्षेपण होणार आहे.

प्रक्षेपण प्रक्रियेचा भाग म्हणून पीएसएलव्हीला पेलोड इंटिग्रेशन फॅसिलिटीमधून श्रीहरिकोटा येथील स्पेसपोर्टवरील मोबाईल सर्व्हिस टॉवरमध्ये पुढील टप्प्यासाठी आणण्यात आले आहे.

इस्रोचा एजड-०९ हा एक पृथ्वी निरीक्षण उपग्रह आहे. हा उपग्रह कोणत्याही वातावरणात आणि कोणत्याही परिस्थितीत भारताच्या देखरेखीच्या क्षमतेत वाढ करणार आहे. यामुळे पाकिस्तानच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यास मदत होणार आहे. हा उपग्रह सी-बँड सिंथेटिक ॲपार्चर रडारने सुसज्ज आहे ज्यामुळे कोणत्याही वातावरणात २४ तास उच्च क्षमतेचे अर्थात हाय रिझोल्युशनचे फोटो घेणे या उपग्रहाला शक्य आहे.

# मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनीच्या निवासी इमारतीचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते उद्घाटन
## मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनीच्या माध्यमातून सक्षम अधिकारी व कर्मचारी तयार होतील - पालकमंत्री तथा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

छत्रपती संभाजीनगर, दि.१६ मे, (विमाका) :- मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनीच्या माध्यमातून सक्षम अधिकारी व कर्मचारी तयार झाल्याचे चित्र राज्याला निश्चितपणे पहायला मिळेल, असा विश्वास पालकमंत्री तथा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज व्यक्त केला. सर्वसामान्य जनतेला तत्परतेने सेवा देण्यासाठी प्रशिक्षणाचा उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले.

नाथनगर (उत्तर) पैठण येथील मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी या संस्थेच्या नव्याने बांधण्यात आलेल्या प्रशिक्षण व निवासस्थान इमारतीचे उद्घाटन पालकमंत्री तथा सामाजिक न्याय मंत्री श्री. शिरसाट यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी महापौर विकास जैन, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, कार्यकारी अभियंता अशोक येरेकर, प्रबोधिनीचे संचालक खालिद ब.अरब व निबंधक रतनसिंग साळोक, सहायक प्राध्यापक विवेक मंडलीक उपस्थित होते.





पालकमंत्री श्री. शिरसाट म्हणाले, नाथसागर लगतच्या परिसरात असलेली ही प्रशिक्षण प्रबोधिनी मराठवाड्यासाठी अत्यंत महत्वाची आहे. या प्रशिक्षण प्रबोधिनीच्या माध्यमातून प्रशिक्षण घेतलेले अधिकारी-कर्मचारी नागरिकांना चांगल्या सेवा देण्यासोबतच योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करतील. त्यातुन मराठवाडा प्रगतीपथाकडे जाण्यासाठी निश्चितपणे मदत होणार आहे. प्रत्येक शासकीय अधिकारी कर्मचारी यांना शासकीय सेवेत येणारे नवीन बदल स्वीकारण्यासाठी प्रशिक्षण महत्वाचे आहे. शासकीय सेवेत असलेल्या विविध पदावरील अधिकारी तसेच कर्मचारी यांच्यामध्ये प्रशिक्षणाच्या माध्यमातून संवाद निर्माण होईल. तसेच प्रशिक्षणातून कामकाजात बदल होण्यासही मदत होईल. त्यामुळे प्रत्येक अधिकारी कर्मचारी यांनी शासकीय सेवेतील बदल स्वीकारण्या सोबतच शासनाने निश्चित केलेले प्रशिक्षण आवडीने पूर्ण करावे असे आवाहन त्यांनी केले.

शासकीय सेवेत कामकाज करताना अधिकाऱ्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली तर ते निश्चितपणे अधिक चांगली सेवा देतील. आपल्या कर्मचाऱ्यांना सातत्याने प्रोत्साहन दिले पाहिजे. असे सांगुन पालकमंत्री श्री.शिरसाट म्हणाले, पैठण येथे कार्यरत असलेले प्रशिक्षण केंद्र राज्यातील एक चांगले प्रशिक्षण केंद्र म्हणून ओळखले जाईल, या प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणासाठी येणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांनी संवाद वाढवावा, तसेच पुढील कालावधीत या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून सक्षम अधिकारी कर्मचारी तयार झालेले राज्याला पहायला मिळतील अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांचा शुभेच्छा संदेश असलेली चित्रफित यावेळी दाखविण्यात आली. शुभेच्छा संदेशात बोलतांना श्रीमती सौनिक म्हणाल्या, पैठण येथील ही प्रबोधिनी केवळ एक प्रशिक्षण केंद्र न राहता एक विचार केंद्र ठरेल, जिथे कृत्रिम बुध्दीमत्ता, डिजीटल गर्व्हनेस, सायबर सुरक्षेची जाणीव, आणि डेटा आधारित निर्णय प्रक्रियेवर विशेष भर या ठिकाणी देण्यात येणार आहे.

विभागीय आयुक्त दिलीप गावडे म्हणाले, पैठण येथील प्रशिक्षण संस्थेला २०१३ मध्ये विभागीय प्रशिक्षण संस्थेचा दर्जा मिळाला. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांसाठी वर्ग-२ व वर्ग-३ अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ही प्रशिक्षण संस्था सातत्याने प्रशिक्षण देण्याचे काम करते. प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून शासकीय सेवेत रुजू झालेल्या अधिकारी कर्मचारी यांना शासकीय सेवेतील पहिले प्रशिक्षण, उजळणी प्रशिक्षण व पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण अशा पातळीवर वर्षभर प्रशिक्षणाचे काम सुरू आहे. राज्यात सहा महसूली विभागात असलेल्या प्रशिक्षण संस्थेपैकी पैठण येथील प्रशिक्षण संस्थेचे राज्यात चांगले नाव आहे. या संस्थेने २८ वर्षात २० हजार अधिकारी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे.

पैठण येथील या प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेतलेले अधिकारी तसेच कर्मचारी केंद्र व राज्य शासनाच्या योजना, सेवा सर्वसामान्य नागरिकांपर्यत प्रभावीपणे पोहचविण्यासाठी महत्वपूर्ण कार्य करतील असा विश्वास व्यक्त करून या प्रशिक्षणाचा उपयोग सर्वसामान्य नागरिकांना सेवा देण्यासाठी करावा असे आवाहनही श्री.गावडे यांनी केले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले, पैठण येथील प्रशिक्षण प्रबोधिनी ही मराठवाड्यासाठी नामांकित प्रबोधिनी आहे. राज्य शासनाने सद्य:स्थितीत अनेक उपक्रम हाती घेतले आहे. यामध्ये १०० दिवस, १५० दिवस या उपक्रमासह माहिती अधिकार, सेवाहक्क अधिनियम कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व सर्वसामान्य नागरिकांना सेवा देण्यासाठी प्रशिक्षण गरजेचे आहे. पैठण येथील प्रबोधिनीमध्ये जलदगतीने पारदर्शक व संवेदनशील पद्धतीने सेवा देण्यासाठी प्रशिक्षण पूर्ण करावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या शुभेच्छा संदेश असलेली चित्रफित दाखविण्यात आली. यावेळी अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

धाराशिव

# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अपेक्षा खराडे हिने दहावी परीक्षेत १०० टक्के गुण

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१५ मे -**



येथील अपेक्षा बालाजी खराडे हिने इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत १०० टक्के गुण मिळवत उत्तीर्ण झाले आहे. इयत्ता दहावीच्या वार्षिक परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहीर करण्यात आला. यामध्ये तेर येथील अपेक्षा बालाजी खराडे हिने बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय काम गिरी करत घवघवीत यश संपादन करत १०० टक्के गुण मिळविले आहेत. त्याच्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. तसेच तेर येथील जि.प.उर्दू शाळेचा दहावीचा निकाल ९५.४५% इतका लागला आहे. आज (दि.१३) रोजी इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल ऑनलाईन पद्धतीने डड्ड बोर्डाच्या वतीने जाहीर झाला असून तेर येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेचा व एकूण निकाल ९५.४५% इतका लागला आहे. यावर्षी प्रशालेतून एकूण २२ विद्यार्थी इयत्ता दहावी परीक्षेत बसवण्यात आले होते. त्यापैकी २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून निकालाची टक्केवारी ९५.४५% इतकी आहे. उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी शाळेतुन प्रथम क्रमांक प्राप्त केलेली विद्यार्थिनी अलीना सिद्दीक ७४.२०% व द्वितीय क्रमांक घेऊन उत्तीर्ण होणारी विद्यार्थिनी पठाण जैनब फातिमा मोहम्मद आसिफ ६७.८०% तृतीय क्रमांक घेऊन उत्तीर्ण होणारी विद्यार्थिनी काजी यशरा इरफान ६६.८०% इतके गुण मिळविले आहे.



### संक्षिप्त वृत्त...



### जिल्हा परिषद हायस्कूलचा निकाल ९७.१४ टक्के

**उमरगा, दि.१५ मे -**

उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलचा दहावीचा निकाल ९७.१४ टक्के लागला असून प्रशालेतील विशेष प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, जि.प.प्रा.शा.बालाजीनगर शाळेच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ.वरवटे, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, बशीर, शेख सरीता उपासे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशालेत प्रथम आलेली सृष्टी बिराजदार ९४.०० द्वित्तीय ममता वरवटे ८२.०० टक्के तर तृतीय आलेला साहील बानकर ७९.४० टक्के तसेच विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेला यासिन खैराटे ७५.०० टक्के या विद्यार्थ्यांचा पण सत्कार करण्यात आला. शाळेतील प्रथम श्रेणीत २१ द्वितीय श्रेणीत ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यावेळी विद्यार्थी व पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### जान्हवी जमदाडे हिचे १० वी परीक्षेत उज्वल यश

**इटकळ, दि.१५ मे -**



तुळजापूर तालुक्यातील मौजे काटी येथील जान्हवी महेश जमदाडे हिने नुकत्याच जाहीर झालेल्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ सेमी इंग्लिशच्या दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. जान्हवीने तब्बल ९६% गुण मिळवून शाळेत आणि काटी परिसरात आपल्या नावाचा दबदबा निर्माण केला आहे. जान्हवीने मराठी विषयात १०० पैकी ९४ गुण मिळाले असून गणित या विषयात १०० पैकी ९५ गुण मिळाले आहेत. तर हिंदी विषयात समर्थने १०० पैकी ८५ गुण मिळविले असून इंग्रजी या विषयात तिला ९४ गुण मिळाले आहेत. सायन्स अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजी विषयात ९५ समाज शास्त्र विषयात ९७ गुण मिळाले. एकूण ५०० पैकी ४७५ गुण मिळवून दहावी परिक्षेत ९६ टक्के गुण घेऊन प्राविण्य मिळवले आहे. ती एल.जी. शिक्षण संकुल शेळगाव (आर) या शाळेची विद्यार्थीनी आहे

### गौसीयाने मिळवले, ९५ टक्के मिळवला प्रथम क्रमांक

**मंगरुळ, दि.१५ मे -**



जिल्हा परिषद प्रशाला मंगरूळ तालुका तुळजापूर येथील विद्यार्थिनी गौसिया आदमशा फकीर हिने ९५ टक्के गुण प्राप्त करत प्रशालेतून प्रथम क्रमांक पटकावला आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ दहावी बोर्ड परीक्षा (एसएससी) मार्च महिन्यात पार पडल्या असून त्याचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये गौसिया फकीर हिने सर्वच विषयात विशेष प्राविण्य मिळवले. मंगरुळ येथील मुलींची शैक्षणिक पार्श्वभूमी अधोरेखित केली असून गेल्यावर्षीप्रमाणेच याही वर्षी मुलींची पकड या परीक्षेवर दिसून आली. जिद्द, चिकाटी, प्रचंड आत्मविश्वास व मेहनत केल्यास यश हमखास पाहायला मिळते याची प्रचिती मला झाल्याचे प्रतिपादन गौसिया फकीर हिने सत्काराला उत्तर देताना केले. त्याच्या या यशाबद्दल जिल्हा परिषदेचे माजी सभापती मुकुंद डोंगरे, सरपंच विजयालक्ष्मी डोंगरे, पोलीस पाटील लक्ष्मण माळी, उपसरंचप गिरीश डोंगरे, मुख्याध्यापक शिवाजी राठोड, सहशिक्षक सुरेश राऊत, चांदसाहेब शेख, ग्रामपंचायत सदस्य आप्पासाहेब जेटीथोर, गोविंद डोंगरे यांनी सत्कार केला व पुढील उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## मित्रचे उपाध्यक्ष आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी सोडविले जनता दरबारातून नागरिकांचे प्रश्न

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ मे -**

शहर व परीसरातील नागरीकांच्या अडचणी सोडविण्यासाठी महाराष्ट्र इन्स्टिटयूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशनचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नळदुर्ग येथे दि. १६ मे रोजी घेतलेल्या जनता दरबारास नागरीकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नागरीकांच्या अडचणी व समस्या जाणुन घेतल्या.

नळदुर्ग येथील नगरपालिका कार्यालयात दि. १६ मे रोजी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नळदुर्ग शहर व परीसरातील नागरीकांच्या अडचणी व समस्या सोडविण्यासाठी जनता दरबारचे आयोजन केले होते.

या जनता दरबारला नळदुर्ग शहर व परीसरातील नागरीकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.



यावेळी नगरपालिका कार्यालयात नागरीकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी प्रत्येक नागरीकांची समस्या व अडचण सजावुन घेऊन त्या सोडविण्याचे आदेश संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

प्रारंभी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे नगरपालिका कार्यालयात आगमन झाल्यानंतर नगरपालिकेचे नगरअभियंता वैभव चिंचोले यांनी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा सत्कार केला.

यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, भाजपचे नळदुर्ग शहराध्यक्ष बसवराज धरणे, भाजपच्या तालुका अध्यक्षा रंजना राठोड, तालुका सरचिटणीस विलास राठोड, तुळजापुर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अ‍ॅड. आशिष सोनटक्के, माजी जि.प.सदस्य अ‍ॅड.दीपक आलुरे, माजी नगरसेवक संजय बताले,

भाजपचे माजी शहर अध्यक्ष पद्माकर घोडके, सुशांत भुमकर, माजी नगराध्यक्ष उदय जगदाळे, धीमाजी घुगे, माजी नगरसेवक सुधीर हजारे, संजय विठ्ठल जाधव, विनायक अहंकारी,

भाजपचे तालुका सरचिटणीस श्रमिक पोतदार, माजी पंचायत समिती सदस्य साहेबराव घुगे, विजय शिंगाडे, भाजपचे शहर उपाध्यक्ष गणेश मोरडे, विजय ठाकुर, बबन चौधरी, अक्षय भोई, दत्ता राजमाने, महादेव पाटील यांच्यासह भाजपचे जिल्हा तसेच तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

या जनता दरबार मध्ये नळदुर्ग शहरातील नागरीकांनी मुलभुत सुविधा, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, पंतप्रधान आवास योजना

तसेच शहरातील रस्त्याच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केले. त्याचबरोबर शहरातील अतिक्रमण काढण्याचे निवेदनही यावेळी नागरिकांकडुन देण्यात आले आहे.

## सोलापूरातील भाविकाकडून श्री तुळजाभवानी देवींच्या चरणी साडे पाच तोळे सोने अर्पण



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ मे -**

सोलापूर येथील रहिवासी असलेले रामकृष्ण शिवयोगी देवनगांव हे आपल्या संपूर्ण कुटुंबासह आज सकाळी श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे आले होते. दर्शनाच्या वेळी त्यांनी श्री तुळजाभवानी देवीच्या चरणी ५५ ग्रॅम म्हणजेच साडेपाच तोळे सोने श्रद्धेने श्री तुळजाभवानी देवींच्या चरणी अर्पण केले.

अर्पण केलेल्या मध्ये एक सोन्याचा नेकलेस हार (४६.७२० ग्रॅम) व एक सोन्याचा साधा हार (९.०८० ग्रॅम) असे एकूण ५५.८० ग्रॅम सोने देवनगांव कुटुंबीयांनी श्री तुळजाभवानी देवींच्या चरणी अर्पण केले. देवनगण कुटुंब हे निस्सीम श्री तुळजाभवानी देवीचे भक्त असून ते नियमितपणे देवीच्या दर्शनासाठी येत असतात. श्रद्धाभक्तीची दखल घेत श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने देवनगांव कुटुंबीयांचा श्री तुळजाभवानी देवींची प्रतिमा व महावस्त्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी जनसंपर्क अधिकारी गणेश निर्वळ, विश्वास कदम, सहायक जनसंपर्क अधिकारी प्रशांत जाधव, धार्मिक विभागाचे लिपिक राकेश पवार तसेच मंदिर संस्थानचे इतर कर्मचारी उपस्थित होते.

## माय भारत नागरी संरक्षण स्वयंसेवक नोंदणीसाठी युवकांना आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ मे -**

भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाअंतर्गत कार्यरत असलेल्या 'माय भारत' उपक्रमात युवकांना नागरी संरक्षण स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या राष्ट्रव्यापी उपक्रमाचा उद्देश एक सुप्रशिक्षित,सज्ज आणि प्रतिसादक्षम स्वयंसेवक दल तयार करणे हा आहे, जे नैसर्गिक आपत्ती, अपघात, सार्वजनिक आपत्कालीन परिस्थिती व इतर संकटाच्या वेळी नागरी प्रशासनाला सहकार्य करू शकेल. या उपक्रमाअंतर्गत स्वयंसेवकांना बचाव आणि निर्वासन कार्य, प्रथमोपचार, वाहतूक व्यवस्थापन, गर्दी नियंत्रण, सार्वजनिक सुरक्षा आणि पुनर्वसन यासारख्या सेवांमध्ये प्रशिक्षण दिले जाईल.

या मोहिमेमुळे तरुणांमध्ये नागरी जबाबदारी,शिस्त आणि सेवाभाव विकसित होणार असून त्यांना व्यावहारिक जीवनरक्षक कौशल्येही मिळणार आहेत. 'माय भारत' युवकांनी आणि नव्याने सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी https://mybharat.gov.in या अधिकृत पोर्टलवर जाऊन नोंदणी करावी. आपल्या सामर्थ्याने समाजाच्या सुरक्षिततेसाठी योगदान देण्याची ही सुवर्णसंधी असून,जिल्ह्यातील युवकांनी पुढे येऊन या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. नोंदणी प्रक्रिया सोपी असून सर्व इच्छुक तरुण नागरिकांनी या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे,असे आवाहन 'माय भारत - धाराशिव' चे जिल्हा युवा अधिकारी राहुल डोंगरे (संपर्क - ९९७०८२३९३०) यांनी केले आहे.



**धाराशिव :** रूपामाता उद्योग समूह कॉर्पोरेट ऑफिस येथे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांचा रुपामाता समूह यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी रुपामाता मल्टीस्टेटचे कार्यकारी अधिकारी मिलिंद खांडेकर, रुपामाता अर्बनचे कार्यकारी अधिकारी सत्यवान बोधले, रूपामाता उद्योग समूहाचे जनरल मॅनेजर दामोदर शितोळे, रूपामाता अर्बनचे प्रशासकीय अधिकारी विशाल गुंड इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## शहरात गल्ली बोळात रस्त्यांना मोठमोठे खड्डे? पालिकेचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ मे -**

नळदुर्ग शहरात सध्या ९३ कोटी रुपये खर्चाची विकासकामे होत असुन यामध्ये होत असलेली बरीचशी रस्त्याची कामे ही शहराच्या बाहेर असणाऱ्या वस्तीहीन भागात होत आहेत. त्यामुळे या कामामधुन केवळ निधी खर्च करून गुत्तेदार जोपासण्याचे काम केले जात आहे का? अशी चर्चा नागरीकांमधुन होत आहे. आता राजकारणी शहरातील खड्डे पडलेल्या व खराब झालेल्या रस्त्याकडे लक्ष देतील काय? असा प्रश्न विचारला जात आहे.

शहरात सध्या मोठ्या प्रमाणात विकास कामे होत आहेत. आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी शहरासाठी मोठ्या प्रमाणात विकास निधी मंजुर करून आणला असुन या विकास निधीतुन सध्या शहरात व शहरातील वाढीव भागात जिथे वस्ती नाही, अशा ठिकाणी मोठ्या प्रमाणात रस्ता व गटार बांधण्याची कामे केली जात आहेत. वास्तविक पाहता शहरातील शास्त्री चौक ते किल्ला गेट त्याचबरोबर राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक ते राष्ट्रीय महामार्ग आणि चावडी चौक ते बोरीघाट पर्यंत रस्ता होणे अत्यंत गरजेचे होते परंतु याकडे मात्र, पालिका प्रशासनाने जाणीवपुर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसुन येत आहे. या रस्त्यावरून नागरीकांना जाणे, येणे मुश्किलीचे झाले आहे.

शहराबाहेर अनेक भागात जिथे लोक वस्ती नाही अशा ठिकाणी कोट्यावधी रुपयाची विकासकामे कृष्णाई कंट्रक्शन यांच्याकडुन केली जात आहेत. त्याचबरोबर जिथे गरज नाही, अशा ठिकाणी रस्ते आणि गटारीची कामे होत आहेत. मात्र, नागरिकांकडून वारंवार मागणी होऊनही चावडी चौक ते बोरीघाटापर्यंत आणि शास्त्री चौक ते किल्ला गेट पर्यंतच्या रस्त्याचे काम होत नाही हे नळदुर्ग शहरातील नागरीकांचे दुर्दैवच म्हणावे लागेल.

आजघडीला ज्याठिकाणी रस्ता तसेच गटार बांधण्याची गरज नाही आशा ठिकाणी कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करून रस्ते व गटार बांधण्याचे काम केले जात आहे. यावरून केवळ पैसे जिरविण्याचे व गुत्तेदार जोपासण्याचे काम केले जात आहे का असा संशय नागरीकांमधुन व्यक्त केला जात आहे.

वास्तविक पाहता आज नळदुर्ग शहरातील शास्त्री चौक ते किल्ला गेट आणि चावडी चौक ते बोरी घाटापर्यंत त्याच बरोबर राष्ट्रीय महामार्ग ते राजमाता अहिल्यादेवी होळकर चौकापर्यंतचे रस्ते हे नागरीकांसाठी अत्यंत गैरसोईचे झालेले आहेत.मात्र याकडे कोणाचेही लक्ष जात नाही. त्यामुळे जाणीवपुर्वक या रस्त्याकडे दुर्लक्ष करून शहराबाहेर जिथे वस्ती नाही अशा ठिकाणी कोट्यावधी रुपये खर्चाचे सिमेंट रस्ते तसेच गटार बांधकाम करण्याचा अट्टाहास का? असा प्रश्न नागरीकांमधुन विचारला जात आहे.

शहराच्या बाहेरील भागामध्ये अनेक ठिकाणी आपल्या कार्यकर्त्यांच्या भुखंडांना या रस्त्याचा किंवा विकास कामाचा फायदा व्हावा हाच एकमेव उद्देश डोळ्यासमोर ठेवुन ही विकास कामे केली जात आहेत का? अशी चर्चा रंगु लागली आहे.

रस्त्याच्या कामाची मंजुरी घेताना सार्वजनिक बांधकाम विभाग व पालिका प्रशासनाने त्या रस्त्यावर अतिक्रमण आहे कीं नाही याचा विचारच केला नाही. त्यामुळे अशा रस्त्याच्या कामावर मंजुर झालेला निधी हा खर्च न होणारा आहे. त्यामुळे हा निधी तसाच पडुन राहण्यापेक्षा या निधीतुन मुख्य शहरातील रस्त्यांची कामे करून घ्यावेत अशी मागणी शहरवासीयांमधुन जोर धरत आहे. त्यामुळे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी नळदुर्गकरांच्या भावना लक्षात घेऊन तात्काळ नळदुर्ग शहरातील चावडी चौक ते बोरी घाटापर्यंत त्याचबरोबर राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक ते राष्ट्रीय महामार्ग आणि शास्त्री चौक ते किल्ला गेट पर्यंच्या रस्ते तसेच गटार बांधणीचे कामे करण्याचा प्रयत्न करावा अशी मागणी होत आहे.

## ३२ ग्रामपंचायतींना क्षयरोग मुक्तीचा पुरस्कार




**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१६ मे -**

केंद्र शासनाने २०२५ पर्यंत क्षयरोग मुक्त करण्याचे धोरण आखले असुन जिल्हा क्षयरोग मुक्त करण्यासाठी क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत अभियान राबविण्यात येत आहे. या धोरणाअंतर्गत जिल्हयातील ३३० ग्रामपंचायती क्षयरोग मुक्त करण्यात आले आहेत. यात लोहारा तालुक्यातील ३२ ग्रामपंचायतीचा समावेश आहे.

क्षयरोग दुरीकरण करण्यासाठी टी.बी. मुक्त ग्रामपंचायत उपक्रमाचा उद्देश आहे. यामध्ये पात्र ठरलेल्या ग्रामपंचायतीना पहिल्या वर्षी कास्य, दुसऱ्या वर्षी रजत, आणि तिसऱ्या वर्षी सुवर्ण पदक प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. धाराशिव जिल्हातुन सण २०२४ मध्ये ३३० ग्रामपंचायत टी.बी.मुक्त ग्रामपंचायत म्हणुन कास्य सन्मानचिन्हा साठी पात्र झालेल्या आहेत. त्यामध्ये लोहारा तालुक्यातील ३२ ग्रामपंचायतीचा समावेश आहे. या ३२ ग्राम पंचायतीना गटविकास अधिकारी शितल खिंडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.जगदीश बनसोडे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व महात्मा गांधीजींचा प्रतिमा देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी ३२ ग्रामपंचायतीचे सरपंच, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक उपस्थित होते. जिल्हयाला क्षयरोग मुक्त करण्यासाठी नागरीकांनी पुढाकार घ्यावा तसेच आपल्या परिसरातील क्षयरोग रुग्ण दत्तक घेवुन पोषण आहार किट देऊन निक्षयमित्र बनावे तसेच क्षयरोगाचे लक्षणे आढळल्यास त्वरीत जवळच्या आरोग्य केंद्रात तपासणी करुण उपचार घ्यावेत तसेच इतरांनाही जागरुक करावे, असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जगदीश बनसोडे यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील आरोग्य सहाय्यक संजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले व क्षयरोग उपचार पर्यवेक्षक नागेश ढगे, वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक ज्ञानेश्वर बिराजदार, प्रयोगशाळा तंत्रज्ञ निळकंठ गोरडवाड, पर्यवेक्षिका एस.एम.जमादारसह आदींसह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## शासकीय योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवा

### खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर विविध विभागांना निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ मे -**

शासनाच्या विविध योजना गरीब, दिव्यांग, वृद्ध व दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात, यासाठी आवश्यक उपाययोजना त्वरित राबवाव्यात, असे स्पष्ट निर्देश खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी दिले आहेत. लाभार्थ्यांना तहसील व पंचायत समिती कार्यालयांचे चकरा टाळता यावेत, यासाठी शिबिरे आयोजित करण्यावर भर देण्यात आला.

उमरगा तहसील कार्यालयात आयोजित बैठकीत बालसंगोपन योजना, संजय गांधी निराधार योजना, दिव्यांग पगारी योजना आदींच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. यावेळी तहसीलदार गोविंद येरमे, इतर मान्यवर उपस्थित होते.

### मालमत्तेविरुध्द गुन्हे

**धाराशिव, दि.१६ मे -**

फिर्यादी नामे महानंदा प्रदिप पारखे यांच्या सासऱ्यास लोखंडी रॉड सारख्या वस्तुने मारहाण करुन गंभीर जखमी करुन त्यांचे खिशातील ३ हजार काढून घेवून पसार झाल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी महानंदा पारखे यांच्या फिर्यादीवरुन कळंब पोलिसांत गुन्हा नोंदवला आहे.

### टि.सी हरवली आहे

कुमारी रेश्मा गौतम गवारे या नावाची अंतरगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,अंतरगाव ता.भुम येथील इयत्ता १२ वी ची टि सी अंतरगाव-परंडा प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास संपर्क साधावा.
संपर्क क्रमांक -
मो.नं. ९७६७३४४६२२

### नगर परिषद कार्यालय उमरगा

ता.उमरगा जि.धाराशिव

संकेतस्थळ : www.umargamahauth.maharashtra.gov.in

संपर्क ०२४७५-२५२०२३ टोल फ्री नं.१८००२३३११५६ ईमेल:npomergagmail.com

जा.क्र./३३५/२०२५ दिनांक : १५/०५/२०२५

#### जाहीर नोटीस

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९५ (१) अन्वये (जुन्या जीर्ण इमारतीबाबत) उमरगा शहर ही अंतर्गत येणाऱ्या व उमरगा नगरपरिषद अधिकार क्षेत्राअंतर्गत तमाम धोकेदायक इमारती धारकांना नगरपरिषद अधिनियमांतर्गत नोटीस बजावण्यात येते की, शासन परिपत्रक दिनांक ०२ नोव्हेंबर २०१६ नुसार व महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९५ (१) अन्वये शहरातील ज्या भुखंड धारकाच्या इमारती जुन्या व जिर्ण झाल्याअसून त्या इमारती पुर्णपणे मोडकळीस आलेल्या किंवा धोकादायक इमारतीचा कांही भाग पडावयास आलेला आहे. ज्यामुळे तेथुन जाणारे/येणारे, तेथील घरामध्ये राहणारे लोकांस व आजुबाजुचे घरातील जिवीतास धोका होण्याचा संभव आहे.

सबब संबंधीत भुखंड धारकांनी सदरची नोटीस वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याच्या तारेखपासून १५ दिवसाचे आत त्यांचे इमारतीची पुर्णपणे किंवा पडावयास झालेला भाग तातडीने दुरुस्त करुन त्याची डागडुजी करुन घ्यावी. किंवा पुर्णपणे उतरवून घ्यावा. तसेच यापुर्वी आपणास नोटीस बजावलेली/मिळाली नसल्यास सदर जाहीर नोटीस शासकीय गृहीत धरुन उक्त कार्यवाही करावी. तसे न झाल्यास त्याचे होणारे नुकसानाची व सर्व परिणामाची संपुर्ण जबाबदारी संबंधीत इमारत धारकाची राहील. तसेच याबाबत पडवू इमारती संदर्भात जिवीत अथवा वित्त हानी झाल्यास उमरगा नगरपरिषद तथा शासन कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत/-**
(रामकृष्ण जाधवर)
मुख्याधिकारी,
नगर परिषद, उमरगा

## अग्रलेख...

# ‘व्याघ्र’ काळ!

देखण्या, रुबाबदार अशा वैदर्भीय वाघाच्या भूमीत राहण्याच्या गर्वाची अनुभूती घेत असताना, एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात २०० च्यावर वाघ असल्याचा अभिमान प्रदर्शित करताना, येथील वाघिणींना थेट ओडिशाच्या सिमलीपाल व्याघ्र प्रकल्पात स्थलांतरित करून मोठेपण मिरवताना आणि गतवर्षी विक्रमी असे पावणे चार लाख पर्यटक एकट्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात आलेत म्हणून स्वतःची पाठ थोपटून घेत असतानाच, गेल्या पाच दिवसांत वाघाच्या हल्ल्यात तब्बल सहा महिलांचा बळी जाऊनही वनविभाग आणि संबंधित परिसंस्था कमालीची शांत आहे, हे मोठे धक्कादायक आहे. मानव व वन्यजीवांच्या सहजीवनाची संकल्पना मांडत २०१० मध्ये ताडोबा व्याघ्र प्रकल्पात बफर क्षेत्राची निर्मिती झाली. जवळपास ८० गावे त्यात येतात. आजही तेथील गावकऱ्यांचे जंगलावरील अवलंबन काही कमी झालेले नाही. उलट, वाघांची संख्या वाढली. त्यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष पेटला. तसा तो येथे पाचवीलाच पूजला आहे. पण गेल्या आठवडाभरात या संपूर्ण परिसरात घडलेल्या वाघाच्या हल्ल्याच्या घटना थरकाप उडवणाऱ्या आहेत. सिंदेवाही वन परिक्षेत्रात एकाच दिवशी तीन महिलांवर हल्ला करून वाघाने त्यांना ठार केले. त्यात सासू-सुनेचा समावेश होता. अन्य एक महिला कशीबशी वाचली. सलग पुढच्या तीन दिवसांत वाघाने अन्य तीन महिलांच्या नरडीचा घोट घेतला. त्यातील एकीला तर चक्क तिच्या पतीदेखत फरफटत नेले आणि क्षणात ठार केले. कोणतेही संवेदनशील मन हळहळल्याशिवाय राहणार नाही अशा या घटना राज्याच्या एका कोपऱ्यात असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यात घडल्या, नव्हे घडत आहेत. आम्ही जंगलाशेजारी राहतो, रान व रानातले जीव जपतो, आमची रोजगाराची साधनेही जंगलावरच अवलंबून आहेत, हा काय आमचा दोष आहे? असा प्रश्न जेव्हा सांत्वन करायला गेलेल्या वनाधिकाऱ्यांना, राजकीय पुढाऱ्यांना ग्रामस्थ विचारतात तेव्हा निरुत्तर होण्यापलीकडे त्यांच्याकडे पर्याय नसतो. राज्यातील ३५.२१ टक्के जंगल असलेल्या भागाची व तेथे वास्तव्य करणाऱ्या गावकऱ्यांची ही शोकांतिका आहे. जंगल जपण्याची जबाबदारी केवळ आमचीच आहे का, हा त्यांचा प्रश्न तेवढाच स्वाभाविक आणि अंतर्मुख करणारा आहे.

यंदाच्या जानेवारी महिन्यात ‘वाईल्डकॉन-२०२५’ ही भारतातील पहिली परिषद चंद्रपुरात झाली. मानव-वन्यजीव संघर्ष हा या परिषदेचा बीज विषय होता. ‘संरक्षित क्षेत्राबाहेरील वन्यप्राण्यांच्या मुबलक संख्येवर नियंत्रणासाठी अभिनव आणि संवेदनशील उपाययोजना’ असे गोंडस नाव देऊन या परिषदेत दोन दिवस चर्चासत्र रंगले. देश-विदेशातून आलेल्या तज्ज्ञांच्या मंथनातून मानव-वन्यजीव संघर्ष कमी होण्याचा मार्ग निघेल, अशी आशा व्यक्त केली गेली. यापूर्वी असे प्रयत्न झालेच नाही असे नाही, पण आजवर या गंभीर प्रश्नावर कुठलीच उपाययोजना प्रभावी ठरली असे ऐकिवात नाही. खरे तर, अशा परिषदा आणि संमेलनांतून या समस्येचा मार्ग सापडेल अशी भाबडी आशा करणे चुकीचे आहे. प्रत्यक्ष कृतीशिवाय तो सापडणारही नाही. मध्यंतरी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात वाघ गावाजवळ आला की गावकऱ्यांना लगेच त्यांच्या भ्रमणध्वनीवर सावधगिरीची सूचना देणारे तंत्रज्ञान विकसित केले आणि ते ताडोबात वापरले जात गेले. किंबहुना, या उपक्रमाचे कौतुक खुद्द देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीसुद्धा त्यांच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून केले. तेव्हा मूठभर मांस चढले होते. पण याही पद्धतीचा प्रत्यक्ष किती लाभ झाला याची आकडेवारी वनविभागाने अद्याप जाहीर केली नाही.

जंगलाशेजारी असलेल्या गावकऱ्यांनी तेंदुपत्ता वेचण्यासाठी, सरपण गोळा करण्यासाठी जंगलात जाऊ नये यासाठी वन विभाग उपाययोजना करीत असते, असे सांगितले जाते. त्यांना मोफत गॅस सिलेंडर देण्याची योजना, हिरवे बांबू उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबवला जात आहे म्हणे, पण तरीही अशा घटना घडतच आहेत ना, त्याचे काय? बरे गावकरी जंगलात गेले नाही तरी गावात शिरून वाघ, बिबटे त्यांचे मुडदे पाडतात, हेही वास्तव नाकारता येत नाही. वन्यप्राण्यांना मुबलक खाद्यान्न व पाण्याची सोय जंगलातच व्हावी यासाठी वन विभागाचे काम सुरू असेलही, पण या साऱ्यांचा परिणाम दिसत नाही, हा खरा चिंतेचा विषय आहे. वर्षभरापूर्वी तर चंद्रपूर येथील महाऔष्णिक वीज केंद्राच्या वसाहतीत शिरून वाघाने एका माउलीच्या हातचे पोर उचलून नेले होते. महानगराला लागून असलेल्या दुर्गापूर परिसरातून एका खेळणाऱ्या मुलाला अलगद उचलून बिबट्याने त्याचा जीव घेतला. या साऱ्या घटना ऐकताना, वाचताना सहज वाटत असल्या तरी त्यामागचे दुःख फार मोठे असते, हे समजून घेतले पाहिजे. अशा घटना घडल्या की, संबंधित वाघ-बिबट्याला शोधायचे, त्यांना बेशुद्ध करून जेरबंद करायचे एवढाच काय तो या समस्येवरचा उपाय आहे, असे समजणे भविष्यातील मोठी चूक ठरेल. समस्येचे मूळ शोधून त्यावर ठोस उपाय शोधला गेला पाहिजे. पर्यटनातून मिळालेल्या निधीचा काही अंश वन विभागाच्या फाऊंडेशनकडे जातो. या निधीचा वापर ज्या राजबिंड्या वाघाच्या भरवशावर ताडोबातील पर्यटन विकसित होत आहे, त्या वाघांच्या संरक्षणासाठी व परिसरातील गावकऱ्यांसाठीही केला पाहिजे. हो, वाघांचे संरक्षणही तेवढेच गरजेचे आहे, हा मुद्दा नाकारता येत नाही. मानव-वन्यजीव संघर्षाची ही दुसरी बाजूही तेवढीच महत्त्वाची असून, तीही समजून घेतली पाहिजे. वाघ जसा माणसाचा काळ बनून सध्या समोर आला आहे, तसाच वाघावरही काळाने वेळोवेळी घाला घातला आहे. २०२५ या नववर्षाची सुरुवात तर त्यांच्यासाठीही बिकट ठरली. हे वर्ष उजाडताच पहिल्या २२ दिवसांत तब्बल ११ वाघांचा मृत्यू झाला. त्यातील काही नैसर्गिक असले तरी काही मृत्यूंना वन विभागाचा निष्काळजीपणा भोवला. जंगलाच्या एका राजपुत्राला ताडोबासारख्या संरक्षित क्षेत्रातही कुजेपर्यंत पडून राहावे लागते, तर दुसऱ्याला आपल्या हक्काच्या जंगलातला रस्ता ओलांडताना रेल्वेच्या धडकेत जीव गमवावा लागतो, हे कशाचे लक्षण आहे? ६ जानेवारीला भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथे एक रूपवान, रुबाबदार वाघ तीन तुकड्यात पडलेला आढळतो! ७ जानेवारीला यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा वनविभागांतर्गत येणाऱ्या उकणी कोळसा खाण परिसरात अर्धवट कुजलेल्या अवस्थेत एक वाघ सापडतो. ८ जानेवारीला नागपूरच्या देवलापार वनपरिक्षेत्रात वाघिणीला आपल्या बछड्याचा मृतदेह बघावा लागतो. असाच एक बछडा ९ जानेवारीला मूल बफरमध्ये मरण पावतो. अशा ११ वाघांच्या मृत्यूचे हे सत्र महिनाभराच्या आतच हलकल्लोळ माजवते, हे चिंताजनक नाही का? एवढे होऊनही वाघ वाढले तर मृत्यू होणारच, अशी रूक्ष प्रतिक्रिया वनाधिकारी व्यक्त करीत असतील तर या वाघांचा ‘काळ’च आला आहे, असे समजायला हरकत नाही!

एकीकडे वाघाच्या हल्ल्यात माणसाला जीव गमवावा लागतो, तर दुसरीकडे वाघही सुरक्षित नाही, ही स्थिती एकूण परिसंस्थेसाठी चिंताजनक आहे. वैदर्भीय उन्हाळा काय केवळ माणसांनाच त्रस्त करतो, वन्यजीवांना नाही? त्यांचाही जीव कासावीस होतो. त्यांच्यासाठी पाणवठे तुंबलेले असणे गरजेचे आहे. तृणभक्षी प्राण्यांची संख्या वाढवण्यावर भर दिला जाणे आवश्यक आहे. जंगलाशेजारी असलेल्या गावकऱ्यांना फाऊंडेशनच्या पैशातून मोफत सोलर यंत्रणा, सातत्याने गॅस सिलेंडरची उपलब्धता आणि तेंदुपत्ता संकलन करण्यासाठी एक सुरक्षित यंत्रणा तयार करून देणेही आवश्यक आहे. किंबहुना, शेतातच तेंदुपत्ता आणि बांबू लावण्यासाठी काही योजना करता येत असेल तर ती केली पाहिजे. लाडक्या बहिणीसारखी एखादी योजना वनांवर आधारित कुटुंबासाठी राबवली गेली पाहिजे. असे बरेच उपाय आहेत. पण खरी गरज या साऱ्या उपायांची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने होणे हाच या समस्येवरचा ठोस उपाय मानला पाहिजे. केवळ कागदी घोडे तेवढे नाचू नये म्हणजे झालं...

## प्रासंगिक

# हे घेऊ की ते घेऊ? बारावीनंतर काय?

**विजय पांढरीपांडे**

नुकतेच इयत्ता बारावीचे निकाल जाहीर झाले. अन् विद्यार्थी, पालक यांची पुढे काय, या प्रश्नासह धावपळ सुरू झाली. या दरम्यान अनेकांनी आयआयटी, जेईई, नीट अशा प्रवेश परीक्षा देखील दिल्या असतील. खरे तर प्रवेश मिळेल की नाही ही चिंता करण्यासारखी परिस्थिती आता राहिलेली नाही. राष्ट्रीय स्तरावरील सरकारी, खाजगी अशा सर्व क्षेत्रांतील संस्थांची संख्या, तसेच विविध कोर्सेसची प्रवेश संख्या कितीतरी पटीने वाढली आहे.आयआयटी, एनआयटीचा अपवाद सोडला तर अनेक राज्यांतील इंजिनीयरिंगच्या शेकडो जागा रिकाम्या राहताहेत. सायन्स, कॉमर्स, कला क्षेत्रात तर सहज प्रवेश मिळेल अशी स्थिती आहे. तरी टेन्शन आहे ते मला हवा असलेला कोर्स/ विषय, मला हव्या त्याच संस्थेत मिळेल की नाही या अट्टहासाचा. हा दुराग्रह सोडला तर मग कशाचीच अडचण नाही. आजकाल राष्ट्रीय स्पर्धा प्रवेश परीक्षेत लाखोंच्या संख्येने विद्यार्थी बसतात. ते गेली दोन चार वर्षे ट्युशनच्या चरकातून पिळून निघालेली असतात. प्रवेश परीक्षेचे निकाल पर्सेंटाईल स्वरूपात जाहीर होतात. त्यामुळे ९५ पर्सेंटाईल असले तरी हवा तो कोर्स हवा त्या संस्थेत न मिळण्याची भीती असतेच. कारण तुमच्या वरचे ५ टक्के विद्यार्थीच संख्येने इतके होतात की त्या मोक्याच्या क्रीम सीट्स संपून जातात, हे गणित समजून घेतले पाहिजे. म्हणजे नैराश्य पचवायला सोपे जाईल.

भविष्यातील गरजा, नोकरी, करीअरचे स्वरूप लक्षात घेतले तर कोणताही कोर्स घेतला, कुठेही शिक्षण घेतले तरी वाव आहे, संधी आहे. कारण तुमचे करीअर हे कुठून, कोणत्या विषयात कोणते ग्रेड्स मिळवून पदवी घेतली यावर मुळीच अवलंबून नसते. किंबहुना अनेक क्षेत्रांत तुम्ही पदवीसाठी जे काही शिकला त्याचा मुळीच उपयोग होत नाही. पदवीमुळे तुम्ही कोणकोणती इतर कौशल्ये आत्मसात केलीत, नवे काही शिकण्याचा तुमचा उत्साह कितपत दांडगा आहे, तुमची वैचारिक निर्णय क्षमता, तार्किक



विवेकाने विश्लेषण करण्याची क्षमता किती जागरूक आहे, यावर तुमचे करीअरचे भविष्य अवलंबून असते

आजकाल संगणक, आयटी, एआय, एमएल वगैरेचे नको तितके स्तोम माजले आहे. या गोष्टी कुठेही, केव्हाही शिकता येतात. त्यासाठी त्या विषयात पदवीच घ्यायला हवी असा आग्रह नको. अगदी सायन्स, कॉमर्सचे शिक्षण घेताना, घेतल्यानंतर या संगणकसंबंधी विषयातले कौशल्य आत्मसात करता येते.

याचा अर्थ सर्वं प्रथम अमुकच कोर्स, अमुकच संस्था हा दुराग्रह सोडला पाहिजे. आधी आपली बौद्धिक क्षमता बघा.आपल्याला काय सोपे जाईल त्याचा विचार करा. त्याच बरोबर आपल्या घरची पालकांची आर्थिक क्षमता बघा. आजकाल खाजगी संस्था, विद्यापीठे अवाच्या सवा शुल्क घेतात. पण त्या तुलनेत शिक्षणात गुणवत्ता, दर्जा असेलच याची खात्री नसते. अनेक ठिकाणी तो नसतोच. संस्था आपल्या घरापासून, शहरापासून किती दूर आहे, तिथला होस्टेलचा खर्च, एकटे राहण्याचा मानसिक ताण आपल्याला (खास करून मुलींना) झेपणार आहे का, याचाही गांभीर्याने विचार केला पाहिजे. एरवी अशा बाबतीत घाईगर्दीने घेतलेले निर्णय पुढे पश्चात्तापास कारणीभूत ठरतात.

कोणताही कोर्स कमी दर्जाचा नाही. कोणतेही क्षेत्र कमी प्रतीचे नाही. नोकरीत मिळणारा पगार म्हणजे तुमचे एकूण उत्पन्न अन् तुमचे शिक्षण (पदवी) याचा देखील काडीमात्र संबंध नसतो. एक वकील दिवसाला आयआयटी इंजिनीयरच्या मासिक पगारापेक्षा जास्त कमाई करू शकतो हे सत्य, वास्तव आहे. तेव्हा कशाच्याही संदर्भात निराश न होता उत्साहाने, खुल्या दिलाने, काहीशा लवचीक धोरणाने या बारावीनंतरच्या निर्णय प्रक्रियेला सामोरे जा. खास करून पालकांनी मुलाची आवड, त्याची क्षमता, त्याची भावनिक जडणघडण याचा प्रामुख्याने विचार करावा. गर्दी जिकडे चालली आहे तिकडे धावणे हा शुद्ध वेडेपणा झाला. जिथे गर्दी नाही तिथे जास्त सौंदर्य, जास्त संधी असते ही आशावादी वृत्ती ठेवावी.

आता सगळीकडे नाही तरी आपल्या महाराष्ट्रात नवे शैक्षणिक धोरण राबवणे सुरू झाले आहे. यात बरीच लवचीकता आहे. वेगवेगळ्या विषयाची आवडीनुसार निवड करण्याचे स्वातंत्र्य आहे. शिकताना वेगवेगळी कौशल्ये आत्मसात करण्याची देखील संधी आहे. कृती शिक्षणावर, प्रॅक्टिकल अनुभवावर भर आहे. वेगवेगळ्या ठिकाणचे ऑनलाईन कोर्सेस करण्याचे अन् त्याद्वारे कमावलेले क्रेडिट पदवीसाठी ग्राह्य धरण्याचे धोरण आहे.य ाची सर्व माहिती मिळवून (जी सर्व संस्थांच्या, कॉलेज विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध असते) ती समजून घेऊन त्याचा लाभ घेतला तर कुणालाही निराश होण्याचे कारण उरणार नाही. उपलब्ध माहितीचा उपयोग आपल्या भल्यासाठी करून घेतला तर भविष्यातले अर्धे अधिक प्रश्न सहज सुटतीलअन् पुढील उच्च शिक्षण हा आनंददायी अनुभव ठरेल.

७६५९०८४५५५

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# बांधकामांचा पसारा कोणी आवरायचा?

उपराजधानी सध्या ‘अंडर कन्स्ट्रक्शन’ झाली आहे. सार्वजनिक कामांसोबत खाजगी इमारतींच्या बांधकामांची लाट आली आहे आणि या लाटेत शहरभर विकासाचा पसारा मांडलेला आहे. चौकांच्या कोपऱ्यात पडलेले सिमेंटचे गट्टू, रस्त्यावर पसरलेली गिट्टीची चुरी, गल्लीबोळांमध्ये अस्ताव्यस्त पसरलेले विटांचे तुकडे आणि रस्ता डांबराचा की वाळूचा? असा प्रश्न पडण्यासारखी स्थिती! दुचाकी आणि सायकलस्वार घसरून पडण्याची १०० टक्के हमी! बांधकामासोबतच पाडकाम सुरू असलेल्या ठिकाणांचाही विचार आहे.नागपूर शहर झपाट्याने विकसित होत आहे. नवनवीन इमारती, रस्ते आणि अन्य पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत. पण, या विकास प्रक्रियेच्या उत्तरार्धातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रस्त्यावर पसरलेले बांधकाम साहित्याचे अवशेष! पाडकामात सिमेंट-विटांचे मोठे तुकडे आणि इतर घनकचरा मोठ्या प्रमाणात निघतो. हे साहित्य रस्त्याच्या कडेला टाकतात आणि काही उपद्रवींच्या कामगिरीने तिथे कचऱ्याचा ढीग आकाराला येतो. भटके कुत्रे आणि गाईंचा मुक्काम या ढीगावर जमतो. सुंदर नागपूर-स्वच्छ नागपूर संकल्पनेची वाट लागते. बांधकाम साहित्यामुळे रस्त्यांची रुंदी कमी होते. परिणामी वाहतुकीची कोंडी होते आणि नागरिकांचा वेळ-इंधन वाया जाते. काही वेळा रुग्णवाहिका किंवा अग्निशमन वाहनांसारख्या आपत्कालीन सेवांनाही याचा फटका बसतो. शहरातील काही फूटपाथवरून चालणेही पादचाऱ्यांना अशक्य झाले आहे. फूटपाथवर साठवलेले साहित्य त्यांच्यासाठी धोकादायक ठरते. धूळ, सिमेंट, रेती आणि मोठ्या अर्थ मुव्हिंग मशिन्सच्या आवाजाने ध्वनिप्रदूषणात भरच पडते. थातुरमातुर स्वच्छता होत असली तरी, बांधलेल्या रस्त्यातून गडर लाईन टाकायची राहिल्याची आठवण होते. खोदकाम सुरू आणि पुन्हा पहिले पाढे पंचावन्न! तिथला पसारा अजून आवरायचाच असताना, अगम्य अशा जाड आणि रंगीत केबल्स टाकण्यासाठी पुन्हा खोदकाम! खाजगी बांधकामाच्या ठिकाणी बोअरवेलचा उपसा, सिमेंटचे वाळलेले गोळे, टाईल्सचे लहानमोठे तुकडे, खरडे आणि पॅकिंगच्या खरड्यांसोबतच अनाकलनीय अशा कचऱ्याची निर्मिती होत असते. एकानंतर एक अशा या क्रिया सुरूच असतात आणि त्यापुढे नागरिकांची सपशेल शरणागती असते.

महानगरपालिकेने अशा प्रकारच्या अनधिकृत साठवणींवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. बांधकाम व्यावसायिकांना यासाठी निश्चित जागा देण्यासह नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व्हायला हवी. यासाठी, नागपूर महानगरपालिकेने चांगला पुढाकार घेतला आहे. पाडकाम आणि बांधकामातून निघालेला कचरा उचलून नेण्यासाठी नागरिक महानगरपालिकेला संपर्क करू शकतात. यासाठी मनपाने हेल्पलाईन जारी केली आहे. बांधकामकर्त्याने मनपाच्या माय नागपूर ॲपवर जाऊन या सेवेसाठी नोंदणी करायची आहे. हे निरुपयोगी साहित्य उचलून नेण्यासाठी मनपा प्रति ट्रक याप्रमाणे पैसे आकारणी करते. हा घनकचरा भांडेवाडीच्या बाजूला मोकळ्या जागेवर टाकला जातो. रेती, सिमेंट, विटा, गिट्टी, चुरी अशा साहित्यावर प्रक्रीया करणारा प्रकल्प या ठिकाणी उभारण्याचे प्रस्तावित आहे. खरं तर ही खूपच प्रभावी योजना आहे. पण, लक्षात कोण घेतो? मनपाचे एनडीएस अर्थात उपद्रव शोध पथकही कार्यरत आहे. रस्त्यांसोबत गल्लीबोळात सुरू असलेल्या बांधकाम साईट्सवर हमखास दिसणाऱ्या या ‘उपद्रवा’ची जाणीव त्यांनाही आहेच. ते त्यांच्यापरीने या समस्येचा निपटारा करतात. अशा पसरलेल्या बांधकाम साहित्यासाठी ते दंड वसूल करतात आणि विटा-रेती उचलून लवकर रस्ता मोकळा करण्यास सांगतात. त्यांची पाठ फिरली की संपला विषय! पुन्हा एखाद्या अधिकाऱ्याने विचारलंच तर आधी भरलेल्या पैशांची पावती दाखवून मान सोडवून घेण्याचेही प्रकार सर्वज्ञात आहेत. अशा महाभागांची आकडेवारी मनपाकडून नियमित जारी होते, हा भाग अलहिदा!

नागपुरात जी २० परिषदेच्या वेळी आलेल्या निधीतून एकूण १२ चौकांच्या सौंदर्यीकरणाचे काम सुरू आहे. सौंदर्यीकरण म्हणजे जागोजागी गट्टू लावणे नव्हे, हे सुजाण नागरिक जाणतातच. हेमाडपंथी तंत्राने लावलेल्या त्या गट्टूंपैकी एखादा निघाला की, उरलेली रांग निघालीच समजा! जमिनीतून बाहेर डोकावणाऱ्या केबल्स हा त्या सौंदर्यीकरणाचाच भाग असतील का? कृतिशील प्रशासन आणि जागरूक नागरिक यांच्या समन्वयातूनच हा प्रश्न निकाली निघणार आहे. रस्त्यावर आणि चौकांच्या कोपऱ्यांवर पडलेल्या या घनकचऱ्याचा योग्य निपटारा व्हायलाच हवा.

नागपूरसारख्या मोठ्या शहरात रस्त्यावर बांधकाम साहित्य साठवणे ही गंभीर समस्या आहे. नागरिकांनी आणि प्रशासनाने एकत्र येऊन या समस्येवर उपाययोजना केली पाहिजे, तरच सुरक्षित आणि सुरळीत वाहतूक शक्य होईल. विकास आणि व्यवस्था हातात हात घालूनच पुढे जाऊ शकतात.

९८५०३३९२४०


## दखल

# ठाकरेंची नाकेबंदी, काकांचा ‘दादा, मला वाचवा’

**मोरेश्वर बडगे**

गेल्या आठवड्यात देशात युद्धाचे वातावरण होते. राजकारणातही स्फोट झाले. ‘शिल्लक राष्ट्रवादी’चे सुप्रीमो शरद पवार यांनी केलेल्या सर्जिकल हल्ल्यात ‘शिल्लक शिवसेने’चे उद्धव ठाकरे यांचे उरलेसुरले साम्राज्य तुटफूट झाले. महाराष्ट्राच्या राजकारणाची तर मोठी विचित्र परिस्थिती आहे. वैचारिक बांधिलकी तर केव्हाच संपली. विकासाच्या कामांसाठी फंड मिळत नाही असे सांगून सत्ता पक्षाशी मिठी मारण्याचे राजकारण पाहायला मिळते आहे. सध्या कुठल्याही मोठ्या निवडणुका नाहीत. तरीही फोडाफोडी सुरू आहे. सत्तेसाठीची हतबलता बड्या बड्या राजकारण्यांना अस्वस्थ करते आहे. आयुष्याच्या संध्याकाळी शरद पवारांनी मोठा डाव टाकला आहे. शरद पवारांच्या प्रेमात पडायचे नाही हा अलिखित नियम आहे. हा नियम जे मोडतात त्यांचा ‘उद्धव ठाकरे’ होतो. शरद पवार हा राजकारणातला ‘बर्म्युडा ट्रँगल’ मानला जातो. ह्या ट्रँगलच्या जवळपास येणारे गायब होतात असे मानले जाते. जहाजं, विमानंसुद्धा हा ट्रँगल गिळतो अशा कथा रंगवून सांगितल्या जातात. तरीही काहींना या ट्रँगलच्या जवळ जाण्याचा मोह होतो. शरद पवारांच्या सोबत गेलेले सारे रिकामे झाले हा इतिहास आहे.

पाच वर्षांपूर्वी उद्धव ठाकरे या ‘ट्रँगल’च्या सापळ्यात अडकले. ‘तुला मुख्यमंत्री करतो’ असे सांगून शरद पवारांनी उद्धव ठाकरेंना नादी लावलं. भाजपापासून तोडलं. काँग्रेसला सोबत घेऊन महाविकास आघाडी नावाची गाजराची पुंगी बनवली. ती वाजणारच नव्हती. अडीच वर्षांत सरकार पडले. उद्धव यांच्या विरोधात शिवसेनेच्या आमदारांनी बंड केले. भाजपासोबत जाऊन एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात सरकार बनवलं तेव्हापासून उद्धव ठाकरे फडफड करीत आहेत. चुकीच्या माणसाच्या संगतीत गेले तर काय होते याचा ठाकरे आणि त्यांची शिवसेना हा नमुना आहे. ‘काँग्रेससोबत कधीही जाणार नाही’ असे बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते. त्यांचा वारसा सांगणाऱ्या उद्धव यांनी नेमके उलटे केले. हिंदुत्व सोडले. काय मिळाले? नियती मोठी क्रूर असते. याच जन्मी हिशेब चुकवावा लागतो. हातचा पक्ष गेला, ‘धनुष्यबाण’ हे निवडणूक चिन्ह गेले, सत्ता गेली, मुलगा आदित्यचे करीअर धोक्यात आले. ‘माझा बाप चोरला’ असे ओरडत उद्धव फिरताहेत. पण कोण ऐकणार? मुंबई महापालिकेची निवडणूकही जिंकण्याची ताकद आता ठाकरे सेनेकडे उरली नाही. ज्यांच्या जोरावर उद्धव ठाकरे यांनी भाजपाला शिंगावर घेतले त्या शरद पवारांना तर भाजपासोबत जाण्याचे वेध लागले आहेत. ‘२५ वर्षे आम्ही युतीत सडलो’ असे उद्धव म्हणाले होते. आज काय म्हणणार? बोलती बंद आहे.



शरद पवारांना जाब विचारण्याची हिंमतही आता उद्धव यांच्यात उरली नाही. दोर केव्हाच कापले गेले आहेत. एकनाथ शिंदे या एकेकाळच्या कट्टर शिवसैनिकाला आवाज देता आला असता. पण उद्धव यांनी तसे संबंध ठेवलेच नाहीत. ‘गद्दार’, ‘गद्दार’ म्हणत राहिले. अजितदादा पवार यांनी दोन वर्षांपूर्वी काकांचा राष्ट्रवादी पक्ष फोडला. सुरुवातीचा काही काळ सोडला तर काका-पुतण्यात बोलचाल बंद नव्हती. संपर्क होता. कुटुंबाच्या बहाण्याने दोघांच्या गाठीभेटी सुरू होत्या. काका-पुतण्याची भांडणे म्हणजे मिलीभगत आहे असे अनेकांना आजही वाटते. उद्धव यांनी शरद पवारांवर फाजील विश्वास ठेवला. पवारांना पुन्हा चांगले दिवस येतील, ते पुन्हा आपल्याला मुख्यमंत्रिपदी बसवतील अशी आशा उद्धव बाळगून होते. मात्र सारे पत्ते उलटे पडत गेले. देवेंद्र फडणवीस यांना टोमणे मारण्यात त्यांनी दिवस काढले. आज शरद पवारांनाच ते नकोसे झाले आहेत. काँग्रेसने तर मागेच त्यांना सोडल्यासारखे आहे. एवढेच काय, त्यांचे भाऊ राज ठाकरे हेही त्यांना टाळी द्यायला तयार नाहीत.

संभ्रम, संभ्रमावस्था हे शब्द शरद पवार यांना पाहूनच शब्दकोशात आले असावे. सर्वांना संभ्रमावस्थेत ठेवून महाराष्ट्राचे राजकारण स्वतःभोवती फिरवत ठेवणारे शरद पवार आज आयुष्याच्या संध्याकाळीही कोणाचे? या प्रश्नाचे उत्तर नेमके देता येत नाही. भाजपाविरोधी राजकारण करतो असे सांगत सांगत शरद पवार भाजपाशी जमवून घेत राजकारण करत राहिले. आता अचानक पवारांनी यू टर्न मारला. त्यामुळे त्याची जोरात चर्चा आहे. ठाकरे बंधू एकत्र येणार का? यापेक्षा पवार मोदींसोबत बसणार का? हा चर्चेचा गरमागरम विषय आहे. अजितदादा पवारांनी बंड केले तेव्हाही अनेकांना ते नाटक वाटले. पवारांनी नेमके काय केले? त्यांनी पुतण्याला पुढे पाठवले. त्यांच्यासोबत आपले आठ-दहा मंत्री सरकारमध्ये घुसवले. त्यांची बहुतेक टीम महायुतीत आधीच दाखल आहे. फक्त सुप्रिया सुळे या मुलीसोबत शरद पवार मागे राहिले. मुहूर्ताची वाट आहे. इथपर्यंत सारं शांत होतं. मात्र ‘आपल्या राष्ट्रवादीतल्या काही नेत्यांचा अजितदादांसोबत जायचा विचार आहे’ असे पवार गेल्या आठवड्यात निवडक पत्रकारांशी बोलले आणि एकच खळबळ उडाली. लोकांची कामं करायची असतील, आमदारांना सोबत ठेवायचे असेल आणि त्यासाठी सरकारी फंड मिळवायचा असेल तर सत्तेसोबत असले पाहिजे हे पवारांना छान ठावूक आहे. मात्र आता महायुतीसोबत जायचे म्हटले तर ते अप्रत्यक्ष भाजपासोबत गेल्यासारखे होणार आहे. ‘मी नाही त्यातली, काडी लावा आतली’ असा हा मामला आहे. शरद पवार थेट भाजपामध्ये जाणार नाहीत. ते पुतण्याकडे जातील. शेवटी साऱ्या ‘नद्यां’ना महायुतीतच जायचं आहे. पवार आज ८४ वर्षांचे आहेत. तरीही त्यांची हौस फ़िटलेली नाही. पुढच्या वर्षी त्यांची राज्यसभेची मुदत संपते आहे. पुन्हा राज्यसभेवर जायचे आहे. मात्र त्यासाठी पुतण्याची मदत घेतल्याशिवाय त्यांना पर्याय नाही. शरद पवार पक्षाचे फक्त ८ खासदार आणि १० आमदार आहेत. पुतण्यासोबत गेले तर महायुतीच्या मदतीने काका पुन्हा राज्यसभेवर जाऊ शकतात. अजून तसे काही ठरलेले नाही. पण काका किती दूरचा विचार फार आधी करून ठेवतात त्याचा हा नमुना आहे. ‘काका मला वाचवा’ ही किंकाळी इतिहासात गाजली. आता इतिहास बदलणार आहे. ‘काका मला वाचवा’ऐवजी ‘दादा मला वाचवा’ अशी आरोळी ऐकू येऊ शकते. त्याची सुरुवात झाली आहे. शरद पवारांनी दबक्या आवाजात भाजपाची बाजू उचलून धरणे सुरू केले आहे. पाकिस्तानशी युद्धावर लोकसभेत चर्चा करा ही विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची मागणी पवारांनी फेटाळून लावली. त्यापेक्षा सर्वपक्षीय बैठक चांगली राहील असा मधला मार्ग पवारांनी सुचवला आहे. पवारांनी सैन्याचे कौतुक केले आहे. हे पवार नव्हे, एक बाप बोलतो आहे. पवारांनी अनेकांना बनवले, अनेकांना संपवले. मात्र संधी असूनही त्यांना आपल्या मुलीचे म्हणजे सुप्रिया सुळे यांचे नेतृत्व प्रस्थापित करून देता आले नाही. सुप्रिया तीनदा लोकसभेवर बारामतीतून निवडून आल्या आहेत. लोकसभेत त्या सक्रियही आहेत. मात्र अजूनही त्यांच्याकडे ‘शरद पवारांची कन्या’ म्हणूनच पाहिले जाते. एक बाप म्हणून पवारांच्या मनात ही खंत आहे. सुप्रियाला एनडीएमध्ये ढकलायचे असे त्यांच्या मनात आहे. सध्या त्यासाठीच आवश्यक ती पार्श्वभूमी ते तयार करताना दिसत आहेत. मोदी मंत्रिमंडळाचा विस्तार लवकरच अपेक्षित आहे. त्यावेळी सुप्रिया सुळे मंत्रिमंडळात दिसतील. राजकारण खूप बदलत आहे. स्वागताला तयार राहा.


९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### महाराष्ट्र पोलिस दलाचे अभिनंदनीय कार्य

पोलिस दलाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे सामान्य नागरिकांना संरक्षण, न्याय आणि समाजकंटकांवर अंकुश आणि शिक्षा या तत्त्वाप्रमाणे कार्यरत राहणे हे अपेक्षित आहे. परंतु अनेक घटनांमध्ये या दलातील काही कामचुकार आणि स्वार्थी कर्मचाऱ्यांच्या वर्तनामुळे प्रामाणिक व कार्यक्षम कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊन या विभागाची नाचक्की होत असते. अपराधी प्रवृत्तीच्या लोकांना आपल्या अधिकाराचा गैरफायदा करून त्यांची अपराधी कृत्ये उघडकीस न आणणे, त्यांच्यावर गुन्हे दाखल न करणे, त्यातून आर्थिक लाभ घेणे, इत्यादी विविध प्रकरणांत गुंतलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून निलंबन किंवा बडतर्फीच्या वार्ता वाचण्यात आल्या की पोलिस दलाविषयी असलेला आदर दुणावतो. तसेच या दलातील कर्तव्यदक्ष, संवेदनशील व प्रामाणिक पोलिस कर्मचाऱ्याच्या कर्तृत्वाची वार्ता पण सुखावून जाते.

वस्तुतः पोलिस दलाच्या कार्यतत्परतेच्या घटना, वार्ता या जास्त असतात. त्या वाचण्यात आल्या की सामान्य




नागरिकांना अभिमान व समाज सुरक्षिततेविषयी आत्मविश्वास वाढतो. काही घटना, गुन्हे तपास आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने इतक्या तत्परतेने पूर्ण केला जातो की गुन्हेगारांवर जरब बसते, ते पकडले जातात. अशा कर्मचाऱ्यांचे कौतुक करावेसे वाटते. उच्चस्तरीय वरिष्ठ अधिकारी यांची दखलही घेतात. पोलिस दलातील गैरकृत्य व अपराधी प्रवृत्ती कर्मचाऱ्यांच्या वर्तनावर करडी नजर ठेवून त्यांचा शोध घेणे, त्यांचे खाते बदल करणे किंवा बदली करणे आणि अशा कृत्यांपासून प्रवृत्त करणे, हे मोठे आणि सातत्याचे आव्हान आहे. शहराचे विस्तारीकरण, वाढती लोकसंख्या आणि त्यातूनच जन्माला आलेले गुन्हेगार, समाज माध्यमातून घडणारे गुन्हे, अपुरी कर्मचारी संख्या, आवश्यक साधन अपूर्णता इत्यादींना गृहीत धरून कार्य होत आहे. हे अभिनंदनीय असून महाराष्ट्र पोलिस उच्चस्तरीय कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांनी हे शिवधनुष्य लीलया पेलले आहे.

**संजय पाठक**/नागपूर

## वाचक पत्रे

### बळीराजाला कोणी वाली आहे का?

विधानसभा २०२४ च्या निवडणुकीदरम्यान महायुतीच्या नेत्यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे मोठे आश्वासन दिले होते. मात्र सत्तेवर आल्यानंतर या आश्वासनाची अंमलबजावणी झाल्याचे काहीही चित्र दिसत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची कर्जमाफी केवळ एक जुमला ठरणार का? असा सवाल सर्वत्र उपस्थित होतो आहे. महायुतीच्या प्रचारात २ लाखांपर्यंतची शेतकरी कर्जमाफी देण्याचे जाहीर आश्वासन देण्यात आले होते. परंतु २०२५ च्या मे अखेरपर्यंत कोणतीही अधिकृत योजना किंवा आदेश शासनाकडून जाहीर झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे आणि नाराजीचे वातावरण आहे. महाराष्ट्रातील काही महत्त्वाच्या आकडेवारीनुसार : सुमारे १.५ कोटी शेतकरी राज्यात सक्रिय आहेत, त्यापैकी ७० लाखांहून अधिक शेतकरी बँक कर्जदार आहेत. त्यापैकी ४० लाखांपेक्षा अधिक शेतकरी थकित कर्जदार आहेत, ज्यांना बँकांकडून पुढील कर्ज मिळणे कठीण झाले आहे.

सन २०२३-२४ मध्ये राज्यात अवकाळी पावसामुळे ८५ लाख हेक्टरहून अधिक क्षेत्राचे नुकसान झाले, ज्यामुळे हजारो कोटींचे नुकसान झाले. सोयाबीन, कांदा, बाजरी अशा पिकांना अपेक्षित बाजारभाव न मिळाल्याने शेतकऱ्यांचे उत्पादन विक्रीतच मोठे नुकसान झाले आहे. सामान्य शेतकऱ्याचा प्रति एकर उत्पादन खर्च सध्या २०-३० टक्क्यांनी वाढला असून त्यात बियाणे, खते, औषधे आणि मजुरीचा मोठा वाटा आहे. अशा गंभीर स्थितीतही शासनाकडून कोणतीही ठोस आर्थिक मदत किंवा कर्जमाफी योजनेचा निर्णय घेतलेला नाही. उलट, काही सत्ताधारी नेत्यांची शेतकऱ्यांविषयीची वक्तव्ये अपमानास्पद ठरत आहेत. त्यामुळे बळीराजाला कोणी वाली आहे का? हा प्रश्न अधिक तीव्रतेने उपस्थित होत आहे.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

### अखंड भारत हाच पर्याय!

हीच सोनेरी संधी आहे आपला भारत पुन्हा अखंड करण्यासाठी. तेव्हा भारत सरकारने गाफील न राहता पुन्हा पाकिस्तानचे कंबरडे मोडून टाकण्यासाठी सिद्ध राहावे. आपल्या देशाचा भूभाग पाकला मिळाला तेव्हा आपल्या देशातील नेते हतबल होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक श्रीगुरुजींनी म्हटले होते की, काही दिवस थांबा अखंड भारत पुन्हा आपल्या हाती येईल. पण महत्त्वाकांक्षा, सत्तालोलुपता यामुळे भारताचा काही भूभाग पाकिस्तानला मिळाला, भारताचे विभाजन झाले. पाकिस्तान नावाचे भूत उभे झाले. आता मात्र अखंड भारत हेच आपले उद्दिष्ट असले पाहिजे. पाकने जर पुन्हा वाकडे पाऊल उचलले तर पुन्हा त्याचे कंबरडे मोडावे. अखंड भारत म्हणजे हिंदूची अस्मिता आहे, अखंड भारत म्हणजे जगाचे नेतृत्व आहे. अखंड भारत हेच आपले ध्येय असले पाहिजे.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# महिलांना अर्वाच्य भाषेत बोलणाऱ्या कंत्राटदाराच्या चौकशीचे आदेश

## मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी घेतली गंभीर दखल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मे**
औंढा नागनाथ तालुक्यातील सावळी बहिनाराव येथील महिलांनी गावात सुरू असलेल्या निकृष्ट दर्जाच्या जलजीवन मिशन कामाला विरोध करीत दि १५ मे रोजी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेवर घागर मोर्चा काढीत मुखय कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्यासमोर सरपंच, ग्रामसेवक यांचे होणारे दुर्लक्ष आणि कंत्राटाराने वापरलेली अर्वाच्य भाषा याचा खुलासा केल्यानंतर अंजली रमेश यांनी गंभीर दखल घेत संबंधीत कंत्राटदाराच्या चौकशीचे आदेश देत तत्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

सावळी बहिनाराव येथे तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. महिलांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. गावातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेचे काम सुरू करण्यात आले आहे. या कामासाठी सुमारे ८० लाख रूपयांचा खर्च केला जात आहे. त्यासाठी विहीरीचे खोदकाम करण्यात आले आहे. तर जलवाहीन्या अंथरण्याचे काम सुरू आहे. परंतु ज्या ठिकाणी विहीरीचे खोदकाम केले जात आहे त्याच्या जवळूनच गावातील सांडपाणी वाहून जाणारा नाला आहे. त्यामुळे या विहीरीवरून पाणी पुरवठा नको अशी मागणी गावातील महिलांनी केली. या विहीरीचे पाणी पिल्यास गावकऱ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होईल असे महिलांचे म्हणणे आहे. याशिवाय पाणी योजनेचे कामही निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप महिलांनी केला. या कामासंदर्भात सरपंच व ग्रामसेवकांकडे तक्रार करूनही महिलांना उडवाउडवीची उत्तरे मिळत होती. त्यानंतर महिलांनी थेट कंत्राटराकडे विचारणा केली असता त्याने महिलांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप महिलांनी केला आहे. या प्रकरणात महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषदेसमोर घागर मोर्चा काढला. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांची भेट घेऊन सविस्तर म्हणणे मांडले. कंत्राटदाराने शिवीगाळ केल्याचा आरोप महिलांनी केला आहे.

या प्रकरणात तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अंजली रमेश यांनी दिले आहेत. या चौकशी अहवालात काय निष्पन्न होते याकडे आता गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# लाच मागितल्याप्रकरणी वनपाल विरूध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मे**
लाकडांची वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई न करण्यासाठी स्वत:साठी २० हजार व इतर कर्मचाऱ्यांसाठी १० हजार अशी एकूण तीस हजार रूपयांची लाच मागणाऱ्या वसमत येथील वनपरिक्षेत्रातील वनपाल बालाजी पवार याच्याविरूध्द वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात दि १५ मे रोजी रात्री उशिरा गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी त्याला ताब्यातही घेतले आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सुत्रांनी दिलेल्या माहीतीनुसार वसमत येथे तक्रारदाराचे फर्निचरचे दुकान आहे. त्यासाठी त्यांना लाकडाची आवश्यकता असते.

याप्रकरणात संबंधित तक्रारदाराने हिंगोलीच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दाखल केली. या तक्रारीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून पडताळणी देखील करण्यात आली. या पडताळणीमध्ये वनपाल पवार याने लाच मागितल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपाधिक्षक विकास घनवट, जमादार ज्ञानेश्वर पंचलिंगे, तान्हाजी मुंडे, भगवान मंडलीक, राजाराम फुफाटे, गजानन पवार, शेख अकबर यांच्या पथकाने वसमत येथे सापळा रचला होता. मात्र वनपाल पवार याला संशय आल्याने त्याने लाचेची रक्कम स्विकारली नाही. त्यानंतर या प्रकरणात वनपाल पवार याने लाच मागितल्याचे स्पष्ट झाल्याने त्याच्या विरूध्द वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात लाच मागितल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले आहे. पोलिस उपाधिक्षक विकास घनवट पुढील तपास करीत आहेत.

# आ. तान्हाजी मुटकुळे यांचेहस्ते नेहरू नगर येथील सिमेंट रस्त्याचे भूमीपूजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मे**
शहरातील भागात असलेल्या श्री संत गजानन महाराज मंदिर मागील रस्त्याच्या कामाची भूमिपूजन आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. भाजपचे आ. मुटकुळे यांच्या स्थानिक निधीतून ५० लाखांचा निधी या सिमेंट रस्त्यासाठी देण्यात आला आहे.

यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, नगरपरिषदचे नगर अभियंता प्रतीक नाईक, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, के.के. शिंदे, कैलास काबरा, माजी नगरसेवक शंभू सिंग गहिलोथ, माजी नगरसेवक राजेश गोटे ,प्रा. दुर्गादास साखळे, भाजपा शहराध्यक्ष रजनीश पुरोहित, कैलास शहाणे, हरदिपसिंग भाटिया, डॉ.करडेकर, पुरोहित काका, धनु बाबा यादव, डॉ. अवचार, डॉ. जाधव, बी.टी. सावके, बाळू केंद्रेकर, नरेश अग्रवाल, मनोज शर्मा, डॉ.भालेराव, वसू काका, सचिन शिंदे, प्रशांत सोनी, कुलदिप मस्ट, बाळू मोरे, देशपांडे काका, अँड. शिरसाठ, संजय जाधव, यांच्या नेहरू नगर भागातील नागरीक उपस्थीत होते, नेहरूनगर ठाकरे यांच्या घरा पासून ते धनु बाबा यादव यांच्या घरापर्यंत नवीन सिमेंट रस्ता तयार करण्यात येत आहे.

# छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव थाटात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मे**
दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी छावा दलाच्यावतीने हिंगोलीमध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा थाटात संपन्न झाला.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छावा दलाचे संस्थापक अध्यक्ष विनायकराव भिसे यांच्या मार्गदर्शनाखाली जन्मोत्सव सोहळा पार पडला. यावेळी येथील गांधी चौकातून छावा दलाच्यावतीने भव्य मोटार सायकल रॅली काढण्यात आली होती. ही रॅली शहरातील प्रमुख मार्गावरून पुन्हा गांधी चौकात आल्यानंतर त्याठिकाणी छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूतळ्यास मान्यवरांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.

यावेळी मोठ्या संख्येने शिवप्रेमी तसेच संभाजी महाराज भक्त सहभागी झाले होते. छत्रपती संभाजी महाराज यांचा जयघोष करीत जन्मोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.

# नूतन जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांचा आ. मुटकुळेंकडून सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मे**
भारतीय जनता पक्षाच्या हिंगोली जिल्हाध्यक्षपदी माजी आ. गजाननराव घुगे यांची निवड झाल्याबद्दल दि १७ मे रोजी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी त्यांचा सत्कार केला.

माजी आमदार तथा व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी भाजपच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाली आहे. एक अनुभवी, उत्कृष्ट पक्षसंघटन निर्माण करणारा आणि आक्रमक जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांच्या माध्यमातून हिंगोली जिल्ह्याला मिळाला असून येत्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत याचा निश्चित पक्षाला फायदा होणार आहे असे मत यावेळी आ. मुटकुळे यांनी व्यक्त केले. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, शंभूसिंह गहिलोत, कैलाशचंद काबरा, अॅड राजेश गोटे, प्रशांत सोनी, रजनीश पुरोहीत, कैलाश शहाणे, उमेश नागरे आदींची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### अवैध वाळू उपसा बंद करण्याची मागणी

हिंगोली- सेनगाव तालुक्यातील चिखलागार येथील पूर्णा नदीच्या पात्रातून दररोज तीस ते चाळीस टिप्पर अवैध वाळू उपसा केल्या जात आहे. सदरील टिप्पर भरधाव वेगाने गावात येतात त्यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत गावकऱ्यांनी शोध घेण्याचा प्रयत्न केला असता सदरील टिप्परवर वाहन क्रमांक नाही. चालकास विचारपूस केली असता चालक अरेरावीची भाषा वापरत असून टिप्पर अंगावर घालण्याची धमकी देत आहेत. दिवसाढवळ्या मोठे टिप्पर अवैध वाळू उपसा व वाहतुक करीत आहेत. परंतु महसुल प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी जाणीवपूर्वक डोळेझाक करीत असल्याचा संशय निर्माण होत आहे. चिखलागार येथील पूर्णा नदीच्या पात्रातून होणारी अवैध वाळू उपसा व वाहतुक बंद करावी या मागणीचे निवेदन गावकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना सादर केले आहे. निवेदनावर सचिन मस्के, गजानन राठोड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### उपजिल्हाधिकाऱ्यांची आरोपातून निर्दोष मुक्तता

हिंगोली- जिल्हाधिकारी हिंगोली यांनी उपजिल्हाधिकारी हिंगोली यांच्याविरुद्ध निवडणुकीच्या कामात जाणून बुजून गैरहजर राहून कर्तव्यात कसूर केला तसेच ०९.०९.२०१४ पासून अनधिकृत, विनापरवाना गैरहजर राहिले व त्यामुळे दुसऱ्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी लागली अशा प्रकारचे विविध आरोप लावून आरोपी विरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी तहसीलदार यांना दिले होते. त्यावरून तहसीलदार यांनी पोलीस स्टेशन शहर येथे तक्रार दाखल केली व रिप्रेझटेशन ऑफ पीपल्स ऐक्टच्या विविध कलमा अन्वये उप जिल्हाधिकारी हिंगोली यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रथम वर्ग न्यायदांडाधिकारी हिंगोली यांचे न्यायालयात सदरील खटला चालविण्यात आला. फिर्यादी पक्षा तर्फे तत्कालीन जिल्हाधिकारी तथा तहसीलदार आणि नोटीस तामील करणार वगैरेची साक्ष नोंदविण्यात आली. आरोपीतर्फे अ‍ॅड. राजेंद्र अग्रवाल यांनी साक्षदाराचा उलट तपास केला. बचावात असा युक्ती वाद करण्यात आला की तथाकथित आरोपीची गैरहजरी ही त्यांची तब्येत खराब झाल्यामुळे व त्यांना दवाखान्यात शरीक व्हावे लागल्यामुळे होती जाणून बुजून नव्हती असा युक्तिवाद आरोपीच्या वतीने करण्यात आला. सदरील बचावास व युक्ती वादास ग्राह्य मानून न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग हिंगोली यांनी आरोपी उपजिल्हाधिकारी यांची आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात आली.आरोपीच्यावतीने ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड राजेंद्र अग्रवाल यांनी काम पाहिले तर अ‍ॅड वि. डी. देशमुख, अ‍ॅड पार्वती पाटील, अ‍ॅड जयश्री सावरगावकर यांनी सहकार्य केले.

### सेनगाव तहसीलचा अनागोंदी कारभार

हिंगोली- सेनगाव तालुक्यातील शिंदेफळ जयचंद काशिनाथ वाठोरे यांनी मागील दोन महिन्यांपासून तलाठ्याकडे वारसा नोंदीसाठी अर्ज दिला परंतु तलाठी, मंडळ अधिकारी तसेच नायब तहसीलदारही शुक्रवारी तहसील कार्यालयात सापडत नाहीत. विचारणा केली असता लग्नाला गेलो, बाहेर आलो असे उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. जयचंद वाठोरे तहसील कार्यालयात चकरा मारून परेशान आहेत. अनागोंदी कारभाराचा हा एक नमुना आहे.

# सैनिकांनी ऑपरेशन सिंदूर यशस्वी केल्याबद्दल भाजपची तिरंगा यात्रा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मे**
पहलगाम येथील निरपराध लोकांना गोळ्या मारून ठार मारणाऱ्या पाकीस्तानातील अतिरेक्यांच्या अड्ड्यांवर भारतीय सैन्यांनी ऑपरेशन सिंदुर यशस्वी करून पाकीस्तानला धडा शिकवला आहे. त्यांचे आतंकी स्थळ मोठ्या प्रमाणावर उध्वस्त केले आहेत. सैनिकांच्या वीरतेला सलाम करण्यासाठी दि १७ मे रोजी हिंगोली भारतीय जनता पक्षाच्यावतीने तिरंगा रॅली काढण्यात येणार असल्याची माहीती जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी दिली आहे.

भारतीय सैनिकांनी केलेल्या पराक्रमाबद्दल त्यांचे आभार मानण्यासाठी आणि वीरतेसाठी येथील गांधी चौकातून दि १७ मे शनिवारी सकाळी ९ वाजता तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीमध्ये राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, आमदार तान्हाजीराव मुटकुळे, भाजप महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा सौ उज्वलाताई तांबाळे, माजी आमदार रामराव वडकुते, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, तसेच माजी सैनिक अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत निघणार आहे.

ही तिरंगा यात्रा मार्ग गांधी चौक, खुराना पेट्रोल पंप, आखरे मेडिकल, पोस्ट ऑफिस व छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे समारोप करण्यात येणार आहे.

या तिरंगा यात्रेला जिल्हा पदाधिकारी, मंडल पदाधिकारी, शहर पदाधिकारी, सर्व मोर्चा व सेल पदाधिकारी, नगरसेवक, जि.प.सदस्य, सरपंच व बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख व सामाजिक कार्यकर्ते, तसेच भारत मातेवर प्रेम करणारे नागरिक व समस्त हिंगोलीवासी यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गजानन घुगे यांनी केले आहे.

# महाराजस्व अभियानाचा जनतेने लाभ घ्यावा- तहसीलदार गाडे



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, १६ मे**
तालुक्यातील जवळा बाजार येथील जिल्हा परिषद हायस्कूल प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रभारी उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार हरीश गाडे व सरपंच स्वाती दत्ता अंभोरे यांनी केले. जवळा बाजार येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबीर कार्यक्रमात विविध विभागाचे स्टॉल व बॅनर्स लावण्यात आले होते. निवडणुक विभाग, पुरवठा विभाग, संगायो विभाग, विविध प्रकारचे प्रमाणपत्र, संकिर्ण विभाग अंतर्गत उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, शिधापत्रिका ,वय व अधिवास प्रमाणपत्र तसेच पंचायत समितीचे घरकुल विभाग, विहिर लाभार्थी याना कार्यरंभ आदेश, कृषी विभागाचे लाभार्थी तसेच ग्रा.पं.चे वतीने काही लाभार्थ्यांना जन्म-मृत्यु दाखले प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी सहाय्यक गटविकास अधिकारी बालाजी गोरे, नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव, तालुका कृषी अधिकारी गोविंद काळे, विस्तार अधिकारी शेख जमीर, कृषी अधिकारी सत्यवान शिवनकर, भूमिलेख अधिकारी प्रदीप महालनकार, पशुधन विकास अधिकारी डॉ. ए बी पालीमकर, वैद्यकीय अधिकारी मारोती केंद्रे यांची उपस्थिती होती.

या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान शिबिरामध्ये उपस्थित नागरिकांना सर्व विभागातील अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अव्वल कारकून श्रीकृष्ण दराडे, इम्रान पठाण, नितीश कुलकर्णी,तलाठी संघाचे तालुकाध्यक्ष विठ्ठल शेळके यांच्यासह तलाठी, मंडळ अधिकारी, कृषी अधिकारी, ग्रामविकास अधिकारी आदींची उपस्थिती होती.

# ९ गुन्हेगारांना हिंगोलीतून केले हद्दपार, हिंगोली ग्रामीण पोलिसांनी पाठविला होता प्रस्ताव

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मे**
हिंगोली ग्रामीण पोलिस विभागाच्यावतीने अवैध दारू व्यवसाय व विक्री करणाऱ्या टोळीविरूध्द पोलिस अधीक्षक यांचे आदेशानुसार कलम ५५ महाराष्ट्र पोलिस कायदा अन्वये ९ गुन्हेगारांना हद्दपार करण्याचे प्रस्ताव पोलिस निरीक्षक डोंगरे यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी यांचेकडे पाठवल्यानंतर त्यांना हद्दपार करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत.

हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारू व्यवसाय आणि विक्री करणाऱ्याविरोधात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, प्रभारी पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांनी ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोनि डोंगरे यांना हद्दपारीचे प्रस्ताव तयार करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार रामु बताश्या पवार रा चिखलवाडी, कमल बबल्या चव्हाण, धुर्पता दिपक चव्हाण रा लिंबाळा, भारत गणेश काळे, रा तलाबकट्टा, शरद साहेबराव पवार रा माळहिवरा, शोभाबाई भारत काळे, राजू मधुकर पवार, अनिल मधुकर पवार, भारत श्रावण काळे सर्व रा कलगाव यांच्याविरूध्द ग्रामीण पोलिस ठाण्यात अवैध दारू विक्री तसेच गावठी दारू विक्रीचे एकूण ४१ गुन्हे दाखल आहेत. त्यांच्या वर्तनात कोणताही बदल होत नसल्याने व त्यांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे व हालचालीमुळे परिसरातील नागरिकांच्या शरीराविरूध्दचे धोके निर्माण होत असल्याने पोलिस अधीक्षकांनी सदर प्रकरणी कडक प्रतिबंध कार्यवाहीबाबत आदेश दिल्यानंतर पोनि डोंगरे यांनी नमुद आरोपीताविरूध्द कलम ५५ महाराष्ट्र पोलिस कायदा अन्वये हद्दपारीचा प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाची सविस्तर तपासणी करून प्रभारी पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांनी त्यांना प्राप्त महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम ५५ अन्वये ९ आरोपींना एक महिन्याकरीता हिंगोली जिल्ह्यातून हद्दपार केल्याचे आदेश काढले आहेत.

दरम्यान, पोलिस विभागाच्यावतीने समाजात शांतता नांदावी म्हणून सराईत गुन्हेगारांची माहीती घेवून त्यांचेबाबत कोम्बींग व ऑलआऊट ऑपरेशनमधून गुन्हेगारांची नियमित तपासणी व कडक प्रतिबंधक कार्यवाही केली जात आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या घोषणेनंतर दिड महिन्यातच नांदेडसाठी दोन 'सीट्रिपलआयटी'ना मंजूरी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ मे-**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्याच्या विकासावर लक्ष केंद्रीत केले असून त्यांच्याच पुढाकारामुळे बीड जिल्ह्यानंतर आता नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर या दोन जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन अ‍ॅन्ड ट्रेनींग' अर्थात 'सीट्रिपलआयटी' मंजूर करण्यात आले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पाठविलेल्या पत्राला कंपनीने सकारात्मक प्रतिसाद दिला असून नांदेड आणि छत्रपती संभाजीनगरसाठी दोन प्रशिक्षण केंद्रे मंजूर केल्याचे पत्राद्वारे कळवले आहे. अजित पवार यांनी घोषणा केल्यानंतर अवघ्या दीड महिन्यात मराठवाड्यातील बीड, नांदेड, संभाजीनगर या तीन जिल्ह्यांसाठी तीन 'सीट्रीपलआयटी' मंजूर झाल्याने 'बोलेन ते करेन...' ही अजित पवार यांची ओळख अधिक ठळक झाली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रयत्न आणि टाटा टेक्नॉलॉजीच्या सहकार्याने महिन्यापूर्वी बीडसाठी 'सीट्रीपलआयटी' मंजूर झाले आहे. त्यानंतर आता नांदेड व छत्रपती संभाजीनगरसाठी दोन 'सीट्रीपलआयटी' मंजूर झाल्याने, मराठवाड्यातील युवकांना जागतिक दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण, उद्योगक्षेत्राला कुशल मनुष्यबळ स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. मराठवाड्यात नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासह अनेक उद्दीष्टांची यानिमित्ताने पूर्ती होणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्याचा विकासावर लक्ष केंद्रीत केले असून त्यांचे सातत्याने मराठवाडा दौरे सुरु आहेत. दि. २३ मार्च २०२५ रोजीच्या मराठवाडा दौऱ्यात नांदेड येथे बोलताना त्यांनी बीड, नांदेड व छत्रपती संभाजीनगर येथे 'सीट्रीपलआयटी' उभारण्याची घोषणा केली होती. दौऱ्यावरुन मुंबईत परतल्यानंतर दि. २५ मार्च २०२५ रोजी तात्काळ टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पत्र लिहून या तीन जिल्ह्यांसाठी 'सीट्रीपलआयटी' उभारण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. कंपनीने दीड महिन्यात तिन्ही जिल्ह्यांसाठी 'सीट्रीपलआयटी' मंजूर केल्याची पत्रे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठवून सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

या 'सीट्रीपलआयटी'मुळे मराठवाड्यातील युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, 'एआय' वापरासह तांत्रिक कौशल्यविकासाची संधी मिळेल.युवकांना उद्योगक्षम बनविणे, रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात 'सीट्रीपलआयटी' महत्वाची भूमिका बजावणार आहेत.

'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविलेल्या पत्रात, नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी प्रत्येकी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन 'सीट्रिपलआयटी' स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याचे कळविले आहे. यापैकी १६२ कोटी ६२ लाख रुपये टाटा टेक्नॉलॉजी तर, उर्वरीत रक्कम राज्य शासन आणि संबंधित जिल्हा प्रशासन देणार आहे. नव्या सेंटरमधून दरवर्षी ७ हजार युवकांना प्रशिक्षित केले जाईल, त्यातून मराठवाड्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने 'सीट्रिपलआयटी' स्थापन केल्यानंतर दरवर्षी प्रत्येकी ७ हजार प्रमाणे मराठवाड्यातील २१ हजार युवकांना उद्योगांच्या (४.०) गरजेनुसार आवश्यक जागतिक दर्जाचे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामुळे उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल तसेच युवकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे रोजगार मिळवणे, स्वयंरोजगार करणे शक्य होणार आहे.

'सीट्रिपलआयटी'च्या स्थापनेनंतर पहिल्या तीन वर्षांसाठी प्रशिक्षण खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' उचलणार आहे. त्यानंतर प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि जिल्हा प्रशासन दरवर्षी प्रत्येकी पन्नास टक्क्यांप्रमाणे विभागून करणार आहेत. यामुळे नांदेड, छत्रपती संभाजीनगर, बीड जिल्ह्यांसह मराठवाड्यातील हजारो युवकांना उद्योगक्षेत्राच्या गरजेप्रमाणे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण मिळेल. त्यांची कौशल्यवृद्धी होईल. उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल. यातून जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या धडाकेबाज, निर्णयक्षम कार्यपद्धतीबद्दल मराठवाड्यातील नागरिकांकडून आनंद, समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# कॉपी प्रकरणात हट्टा येथील बी. फार्मसीचे दोन परीक्षा केंद्र रद्द

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२५ या परीक्षा चालू आहेत. हट्टा येथील एस.व्ही.पी. कॉलेज आणि डिप्लोमा इन फार्मसी इन्स्टिट्यूट या दोन महाविद्यालयामध्ये बी. फार्मसी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी परीक्षा देत होते. विद्यापीठाच्या भरारी पथकाने दि.१४ मे रोजी सदर परीक्षा केंद्रास अचानकपणे भेट दिली. या दरम्यान दोन्ही परीक्षा केंद्रावर सर्वाधिक विद्यार्थी बिनधास्त सामुहिक नक्कल करत असल्याचे निदर्शनास आले.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर महोदयांनी ही बाब अत्यंत गंभीररित्या घेऊन तात्काळ दोन्ही परीक्षा केंद्राची मान्यता रद्द केली. आणि या दोन्ही परीक्षा केंद्रावरील सर्व परीक्षार्थींची परीक्षा दि.१६ मे पासून परभणीच्या प्रेरणा कॉलेज ऑफ फार्मसी येथे घेण्यात येत आहे.

सर्व संबंधीत परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रात बदल झाल्याचे लक्षात घेऊन दि.१६ मे पासून परभणीच्या प्रेरणा कॉलेज ऑफ फार्मसी येथे उपस्थित राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांनी केले आहे.

# मोटरसायकलचा अपघात; एक ठार, तीन जखमी

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १६ मे-**

तालुक्यातील मुख्य रस्त्यावर दोन मोटरसायकलची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात एका मोटरसायकलवरील गंजगाव, ता. बिलोली येथील एक युवक जागीच ठार झाला. तर इतर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

अपघातातील जखमींना देगलूर उपजिल्हा रुग्णालयात प्रथमोपचार केल्यानंतर त्यांना पुढील उपचारासाठी नांदेडला हलविण्यात आले आहे. ही घटना गुरुवारी ता. १५ रोजी दुपारी शेवाळा थडीहिप्परगा या रोडवर घडली.

यासंदर्भात पोलीस सूत्रांकडून हाती आलेली माहिती अशी की, गंजगाव ता. बिलोली येथील युवक मोटरसायकलवरून देगलूरकडे येत होते. तर दुसरी मोटरसायकल देगलूरवरुन शेवाळामार्गे बिलोलीकडे जात असताना दोन मोटरसायकलची शेवाळा-थडीहिप्परगा या रोडवर समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात गंजगाव, ता. बिलोली येथील युवक हणमंत मारुती डुबुकवाड (वय-३१) हे जागीच ठार झाले.

## संक्षिप्त वृत्त

### प्रगतीशील लेखक संघाची नांदेड जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**नांदेड** - येथील ताज पाटील हॉटेल सभागृहात प्रगतीशील लेखक संघाचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष प्रा.डॉ.जी.के.ऐनापुरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत प्रगतीशील लेखक संघाची नांदेड जिल्हा कार्यकारिणीची निवड जाहीर करण्यात आली. याप्रसंगी डॉ.प्रकाश मोगले, डॉ.शत्रुघ्न जाधव ,.प्रा.डॉ.संजय बालाघाटे, डॉ. ज्ञानेश्वर डाखोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रगतीशील लेखक संघाच्या नूतन कार्यकारिणीत जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ. संतोष हंकारे, जिल्हा सचिव प्रा.डॉ.गजानन देवकर, कार्याध्यक्ष प्रा.डॉ.पंजाब शेरे, शहराध्यक्ष डॉ. गजानन इंगोले, जिल्हा सहसचिव प्रा.डॉ.सुभाष रगडे, जिल्हा उपाध्यक्ष डॉ.सचिन खडके, शहर सचिव शीलवंत वाढवे, शहर उपाध्यक्ष पूजा ढवळे, शहर कार्याध्यक्ष डॉ.रेखा वाडेकर, जिल्हा कार्यकारिणी सदस्य - डॉ.व्यंकटी पावडे, डॉ.पंजाब शिंदे, डॉ.संजय झुंबाडे, डॉ.पांडुरंग पांचाळ, डॉ.पंकज मुधोळकर,राजेश टिमकीकर, यांची निवड करण्यात आली आहे. तर सल्लागार समितीत डॉ.रामप्रसाद तौर, डॉ.मा.मा. जाधव, डॉ.प्रकाश मोगले, डॉ.दिलीप चव्हाण यांचा समावेश आहे. यावेळी नवनियुक्त सल्लागार समितीने नूतन कार्यकारिणीचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### राणी लक्ष्मीबाई विद्यालय निवघा बाजारचा ९९.०६ टक्के निकाल

**निवघा बा.-** येथील राणी लक्ष्मीबाई विद्यालयाने आपली उज्वल यशाची परंपरा कायम ठेवत यावर्षीही गुणवत्तेच्या बाबतीत तालुक्यातून दुसरा क्रमांक पटकावला आहे .विशेष म्हणजे या विद्यालयात ग्रामीण भागातून येणारे जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये यावर्षी देखील शाळेचा निकाल ९९.०६ टक्के लागला आहे . एकूण १०७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली यात १०६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यात विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण - ३२, प्रथम श्रेणित उत्तीर्ण - ५०, द्वितीय श्रेणित उत्तीर्ण -२१, तृतीय श्रेणित उत्तीर्ण-३, प्रथम वैशाली देवराव जमदाडे-९५.२०, द्वितीय स्वरांजली अरुण जाधव- ८९.२०, तृतीय अंजली शिवाजी अंभोरे- ८८.६० गुणानुक्रमे उत्तीर्ण झाले आहेत. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन गटशिक्षणाधिकारी किशन फोले, संस्थेचे अध्यक्ष सुभाषराव वानखेडे,मुख्याध्यापक मगर सर, पतंगे सर, चंदेल सर, मोरे मॅडम, देशमुख मॅडम,व सर्व शिक्षकांनी केले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय विद्यालयातील सर्व शिक्षक व आईवडिलांना दिले आहे .

### सपोनि श्रीधर जगताप यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**नरसी** -रामतीर्थ पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष सपोनी श्रीधर जगताप यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी स्थानिक, पोलीस अधिकारी, नागरिक ,पत्रकार, व्यापारी , आणि राजकीय मंडळी एकत्र आल्याने जगताप यांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद पाहायला मिळाला. रामतीर्थ पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या नरसी येथील पोलीस चौकीत हा सोहळा. मोठ्या उत्साहात पार पडला. पोलीस दलातील सहकारी, स्थानिक रहिवासी, राजकीय मंडळी, पत्रकार, व्यापारी, सपोनि जगताप यांना त्यांच्या वाढदिवशी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या संख्येने जमले होते. यावेळी नायगव पोलीस ठाण्याचे प्रभारी उपविभागीय पोलिस अधिकारी किरण पोपळघट कुंटूरचे ठाण्याचे पोलीस अधिकारी रामकृष्ण पाटील, श्रीनिवास पाटील चव्हाण सह परीसरातील नागरिक उपस्थित होते.



### दहावी परिक्षेत श्रीकांत भिसेचे यश

**नांदेड** -नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात येथील गोदावरी इंटरनॅशनल पब्लिक स्कुलचा विद्यार्थी श्रीकांत पुष्पक भिसे यांने ८६.२० टक्के गुण घेवुन यश मिळविले आहे. गोदावरी स्कुल मध्ये तो तिसरा आला असुन त्यांच्या या यशाबद्दल शाळेचे संचालक कैलास पौळ यांच्यासह अनेकांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

# आदिवासी समाजातील पुजा मुरमुरे हीच्या लग्नाचा प्रशांतभाऊ राठोड यांच्या सेवा संकल्प प्रतिष्ठानने उचलला खर्च



**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. १६ मे-**

सनदी अधिकारी प्रशांत भाऊ राठोड यांचेसह त्यांच्या सेवा संकल्प प्रतिष्ठानकडून माहूर किनवट तालुक्यातील असहाय, गोरगरीब नागरिकांच्या विविध अडचणी सोडविण्यासाठी प्रशांत भाऊ हे नेहमीच आग्रही राहत असल्याने किनवट तालुक्यातील सावरगाव येथील आदिवासी समाजातील अनाथ मुलीच्या लग्नाची अडचण कानी पडताच प्रशांत भाऊ राठोड यांनी तात्काळ धाव घेऊन तिच्या लग्नाचे पालकत्व स्वीकारले. तसेच लग्नाकरिता लागणारा आर्थिक भार देखील उचलला. त्यामुळे आदिवासी समाजाबरोबरच संपूर्ण किनवट- माहूर परिसरात प्रशांतभाऊ राठोड यांच्यावर कौतुकासह अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

महाराष्ट्र राज्यासह माहूर किनवट तालुक्यातील गोरगरीब आणि हलाखीच्या परिस्थितीत जगत असलेल्या नागरिकांना हातभार देण्याचा वारसा लाभलेले मंत्रालयीन सनदी अधिकारी प्रशांत भाऊ राठोड यांचेसह त्यांच्या सेवा संकल्प प्रतिष्ठानकडून माहूर किनवट तालुक्यातील प्रत्येक गाव , वाडी, खेडे आणि तांड्यात अडचणीत असलेल्या नागरिकांना सर्व प्रकारची मदत करण्यात येते. गावागावात टँकरने पाणीपुरवठा करण्यासोबतच जंगलातही जंगली जनावरांसाठी पानवठे तयार करून पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तसेच लग्नकार्य आणि इतरही सामाजिक कार्यात सेवा संकल्प प्रतिष्ठानचे कार्यकर्ते प्रशांत भाऊ राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली रात्रंदिवस नागरिकांची जमेल तशी मदत करत आहेत. किनवट तालुक्यातील मौजे सावरगाव येथील पुजा मुरमुरे हिच्या घरची परिस्थिती बिकट असल्यामुळे लग्न पुढे ढकलावे लागेल ,अशी परिस्थिती निर्माण झाल्याची माहिती प्रशांत भाऊ राठोड यांना मिळताच त्यांनी तात्काळ सावरगाव येथे सेवा संकल्प प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांसह जाऊन अनाथ पुजाच्या लग्नाचे पालकत्व स्वीकारून पुराच्या नातेवाईकांना गावकऱ्यांसमक्ष लग्नाचा संपूर्ण खर्च सुपूर्द केला. त्यामुळे आदिवासी समाजातून त्यांच्या या कार्याचे भरभरून कौतुक होत असून इतरही नागरिक अशा प्रकारच्या कार्यात आपणही सहभागी होऊ, अशी इच्छा व्यक्त करताना दिसत होते.

यावेळी ईश्वर जाधव, बंडू राठोड,दिनेश पवार,प्रदीप पवार, पांडु राठोड, अविनाश राठोड, दीपक चव्हाणांसह सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, नायक आणि सावरगाव येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिडको येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्कच्या विकासासाठी निधीची मागणी



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १६ मे-**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजित दादा पवार यांच्याकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क सिडको साठी भरीव निधी देण्यात यावा असे निवेदन देताना विलास गजभारे व एकनाथ वाघमारे यांनी दिले.

नांदेड शहरातील सिडको वसाहती अंतर्गत असलेल्या मध्यवर्ती उद्यानास डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क असे नामकरण करून पार्कच्या विकासासाठी भरीव निधी देण्याची मागणी राष्ट्रवादी पक्षाचे विलास गजभारे व एकनाथ वाघमारे यांनी राज्यचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार त्यांच्याकडे नांदेड दौऱ्यावर आले असताना त्यांची भेट घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे नव्याने विकास कामासाठी भरून निधी देण्यात यावा अशी मागणी एका निवेदनाद्वारे विलास गजभारे व एकनाथ वाघमारे यांनी केले आहे.

# दहावीच्या परीक्षेत हिमायतनगर तालुक्यात यंदाही मुलींनी मारली बाजी


**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १६ मे-**

इयत्ता दहावी बोर्ड परिक्षेत यंदाही मुलींनीच बाजी मारली. हुतात्मा जयवंतराव पाटील कन्या शाळेची विद्यार्थिनी कु. क्षमा देबडवार या विद्यार्थ्यांनीने ९६.२०% गुण प्राप्त करून तालूक्यातून प्रथम येण्याचा बहुमान मिळवीला आहे. तर राजा भगीरथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. वैष्णवी रायेवार हिने ९५.६० % गुण प्राप्त करून दुसरा क्रमांक मिळविला आहे.

हिमायतनगर तालुक्यात १ हजार १०९ विद्यार्थी परिक्षेला बसले होते. त्यांपैकी ९७३ विद्यार्थी हे उत्तीर्ण झाले आहेत. ९१.६६ टक्के जिल्हा परिषद हायस्कूल चा या वर्षी अप्रतिम राहीला आहे. तर राजा भगीरथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ९६.९७ टक्के, हुतात्मा जयवंतराव पाटील कन्या शाळा ९२.४२टक्के, माध्यमिक विद्यालय ५९.०९टक्के, जिल्हा परिषद हायस्कूल जवळगांव ९८.२६टक्के, जिल्हा परिषद हायस्कूल कामारी ९८.११%, राजा भगीरथ विद्यालय धानोरा ८६.८४%, महादजी पाटील विद्यालय कांडली ९१.३०%, कै. श्रीधरराव देशमुख विद्यालय सरसम ८१.२५टक्के, शासकीय आश्रमशाळा दुधड ९८.३६टक्के, हुतात्मा जयवंतराव पाटील विद्यालय खडकी ९३.७८टक्के, शासकीय आश्रमशाळा एकघरी १००टक्के , शेषराव चांदराव राऊत महादापूर ८३.३३टक्के, मनिषा आश्रमशाळा पोटा ९३.१०टक्के, परमेश्वर माध्यमिक विद्यालय विरसणी ९८.६३टक्के, हाजी आदमजी उर्दू शाळा हिमायतनगर ८९.२८टक्के , मातोश्री शेखावत आश्रमशाळा हिमायतनगर २५टक्के असे एकूण १७शाळेचा निकाल लागला असुन सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पेठवडज येथील पाणीपुरवठ्याचे काम वेळेत न झाल्यास संवैधानिक मार्गाने आंदोलन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ मे-**



कंधार तालुक्यातील पेठवडज हे गाव लोकसंख्येने मोठे असलेले गाव असून या गावात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो आहे.

धरण उशाला आणि कोरड घशाला अशी या गावची परिस्थिती असून गावच्या वरच्या भागाला खूप मोठे तळे असून देखील गावात जलप्राधिकरण कार्यालय प्रशासनाच्या उदासीनतेमुळे गावात पिण्याच्या पाणी मिळत नाही. २०२२ साली गावात पिण्याचे शुद्ध पाणी देण्यासाठी जलजीवन मिशन अंतर्गत पंपिंग मशिनरीचे व जलशुद्धीकरण केंद्राचे काम सुरुवात करण्यात आले होते. कोट्यावधी रुपयांचा खर्च करूनही या योजनेतील काम पूर्ण झाले नसून गावात तीव्र पाणीटंचाई व पिण्याची पाण्याची वाताहत आहे. याबाबतीत ग्रामपंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते नारायण गायकवाड यांनी अनेक वेळा कार्यकारी अभियंता जल प्राधिकरण नांदेड यांच्याकडे पाठपुरावा केला मात्र सातत्याने कंत्राटदाराच्या बाजूने भूमिका घेत या कामात होत असलेल्या दिरंगाईबाबत ते उदासीन आहेत. आज नारायण गायकवाड यांनी कार्यकारी अभियंता बोडके यांचे थेट कार्यालय गाठून त्यांना याबाबत जाब विचारला. आपल्या काळात जनतेचे कामे होत नाहीत असा आरोप केला. या कामातील कंत्राटदार अधिकाऱ्यांचे नातलग आहेत. त्यामुळे कामात दिरंगाई होत असूनही गुत्तेदाराचे समर्थन होत केवळ दंडाची नोटीस बजावण्यात येत असल्याचे गायकवाड यांनी सांगितले आहे.

# किनवटमधील सुरक्षा धोक्यात! मुख्य बाजारपेठ दारुडे, गर्दुल्ल्यांच्या ताब्यात

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १६ मे-**

शहरातील मुख्य बाजारपेठ परिसर सध्या दारुड्यांचा अड्डा बनला असून सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. जुनी नगर परिषद इमारत, जी सध्या रिकामी असून तिचा पुनर्विकास होणे अपेक्षित होते, त्या ठिकाणी तळीरामांनी आपला बस्तान ठोकले आहे. २४ तास उघड्यावर मद्य प्राशन करणाऱ्या आणि नशेत धुंद असणाऱ्या मंडळींमुळे नागरिक त्रस्त झाले असून त्यांच्यात प्रचंड रोष निर्माण झाला आहे.

या ठिकाणी भारतीय स्टेट बँकेची मुख्य शाखा तसेच इतर महत्त्वाचे ढच् केंद्र असून तालुक्यातील अब्जावधींचे व्यवहार याठिकाणी होतात. दरमहा शेकडो वृद्ध नागरिक व महिला निवृत्तीवेतन घेण्यासाठी या बँकेत येत असतात. मात्र, बँकेच्या आसपास फिरणारे नशेधुंद व्यक्ती आणि त्यांच्या आक्रमक वर्तनामुळे महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना, विद्यार्थ्यांना आणि व्यापाऱ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.




सुरक्षा व्यवस्थेचा अभाव हे या संपूर्ण परिस्थितीचे मूळ कारण आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक, संविधान चौक, मुख्य बाजारपेठ, वनविभाग कार्यालय, तसेच संपूर्ण व्यापारी भाग हे अत्यंत वर्दळीचे आणि महत्वाचे ठिकाण असूनही पोलिसांची नियमित गस्त वा स्थायी पोलीस बंदोबस्त दिसून येत नाही. त्यामुळे असे दारुडे, गर्दुल्ले आणि नशे करणारे गैरकायद्याचे लोक बिनधास्त एकत्र येत असून कोणताही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

नागरिकांचे म्हणणे आहे की, आम्ही दररोज धास्तीने बाजारात येतो. बँकेत जाताना वृद्धांची चलबिचल होते. महिला सुरक्षित नाहीत. कुठेही कायदा-सुव्यवस्थेचे भान नाही. हे प्रशासन झोपले आहे का? व्यापारी संघटनांनीही यावर तीव्र नाराजी व्यक्त केली असून, तातडीने पोलिस बंदोबस्त वाढवावा, जुनी नगर परिषद इमारत ताब्यात घेऊन तिथे बेकायदेशीर अड्डे हटवावे, आणि शहरातील महत्त्वाच्या भागांमध्ये उउढत तसेच सुरक्षा यंत्रणा तैनात कराव्यात, अशी मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर, प्रशासनाचे दुर्लक्ष, पोलिसांची अनास्था ही बाब विशेष लक्षवेधी ठरत आहे. जर लवकरच कारवाई झाली नाही तर नागरिक रस्त्यावर उतरून आंदोलन छेडतील, असा इशारा स्थानिक नागरिकांकडून दिला जात आहे. किनवट शहराला योग्य सुरक्षा व्यवस्था मिळावी, कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी प्रशासनाने तात्काळ पावले उचलावीत, अन्यथा उद्रेक अटळ असल्याची चर्चा आहे.

# शिवभोजन केंद्राची चौकशी करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ मे-**

शिवभोजन केंद्रात बोगस लाभार्थी दाखवून मोठ्या प्रमाणात केंद्रचालक भष्टाचार करत आहेत. शिवभोजन केंद्राची चौकशी करून केंद्र चालकावर कारवाई करण्याची मागणी डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र राज्य महानगराध्यक्ष नकूल जैन यांनी अन्न नागरी पुरवठा, राज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



राज्य सरकारने सर्व सामान्य व गोरगरीब नागरिकांसाठी शिवभोजन केंद्र सुरू केले आहे. पण शिवभोजन केंद्रात भष्टाचार होत आहे. बोगस लाभार्थी दाखवून बिले उचलण्यात येत आहेत. असे अनेक बोगस बिले नांदेड जिल्ह्यात उचलण्यात आली आहेत. असा प्रकार राज्यात सुरू आहे.

अनेक शिवभोजन चालक राज्य शासनाच्या नियम व अटीनुसार नागरिकांना सुविधा देत नाहीत. अनेक ठिकाणी निकृष्ट भोजन दिले जाते. सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक आहे पण लावले जात नाहीत.काही शिवभोजन केंद्र बंद आहेत. पण त्यांचे बिले बनवून मंजूर केले जातात. यात लाखो रुपयांचा भष्टाचार होतो, असाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

**जिल्हाधिकारी लक्ष देतील का ?**

पुरवठा विभागामध्ये काही शासकीय व निमशासकीय अधिकारी देखील शिवभोजनालयाचे बिल काढण्यासाठी आर्थिक तडजोड करत असल्याची दबक्या आवाजात सध्या चर्चा चालू आहे नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी याकडे लक्ष देतील का असा प्रश्न नकूल जैन यांनी उपस्थित केला आहे.

CMYK

# धाराशिव जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती धाराशिव, सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अतिरिक्त शिक्षक समायोजन प्रक्रिया रद्द करावी: शिक्षक परिषदेची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ मे -**

जिल्ह्यातील खाजगी माध्यमिक अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील अतिरिक्त शिक्षक कर्मचाऱ्यांची संस्था अंतर्गत समायोजन प्रक्रिया त्वरित रद्द करण्यात यावी , अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात गुरुवारी (ता.१५) संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की , दि. १५ मार्च २०२४ रोजी राज्य शालेय शिक्षण विभागाने शिक्षक संचमान्यता संदर्भात अन्यायकारक शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील धाराशिव जिल्ह्यातील खाजगी माध्यमिक अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे संस्था अंतर्गत समायोजन करण्यासंदर्भात जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी दि. ०७ मे २०२५ रोजी पत्र काढले आहे. तथापि शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी जाचक व अन्यायकारक ठरलेल्या दि. १५ मार्च , २०२४ च्या शासन निर्णयास शिक्षकांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ५४५६ / २०२५ द्वारे आव्हान दिले असल्याने सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. निर्णय होईपर्यत ही प्रक्रिया रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष रमेश गटकळ आदींच्या स्वाक्षरी आहेत.

## जिल्ह्यात ३ जूनपर्यंत 'नो फ्लाइंग झोन' लागू

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ मे -**




जिल्ह्यातील सुरक्षा उपाययोजनांच्या पार्श्वभूमीवर अपर जिल्हादंडाधिकारी शोभा जाधव यांनी आज एक महत्त्वपूर्ण आदेश निर्गमित केला आहे.या आदेशानुसार जिल्ह्यात १६ मे २०२५ पासून ३ जून २०२५ पर्यंत 'नो फ्लाइंग झोन' जाहीर करण्यात आला आहे.

भारतीय लष्कराने ऑपरेशन 'सिंदुर' अंतर्गत देशविघातक संघटनांचे-जैश-ए-मोहम्मद (JEM²), लष्कर-ए-तय्यबा (LET) आणि हिजबुल मुजाहिदीन (HM²) - तळ उद्ध्वस्त केले असून, या कारवाईचा सूड घेण्यासाठी दहशतवादी संघटनांनी ड्रोनद्वारे हल्ल्यांची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षक धाराशिव यांच्या सूचनेनुसार तातडीने हा आदेश लागू करण्यात आला आहे.

या कालावधीत जिल्ह्यात ड्रोन, रिमोट नियंत्रित मायक्रो एअरक्राफ्ट, पॅरा ग्लायडर्स, हैंग ग्लायडर्स, हॉट एअर बलून किंवा तत्सम कोणतीही हवेत उडणारी उपकरणे वापरण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती,संस्था किंवा संघटनेवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ नुसार कारवाई केली जाईल, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## सृष्टी शेटे हिचे १० वी परिक्षेत यश

**तुळजापूर, दि.१६ मे -**



तुळजापूर तालुक्यातील बारूळ येथील सृष्टी सोमनाथ शेटे-बोणे या विद्यार्थीनीने इयत्ता १० च्या परिक्षेत ९६.४० टक्के गुण मिळवून घवघवीत यश मिळवल्याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

शेतकरी कुटुंबातील असलेले पत्रकार सोमनाथ शेटे बोणे यांची ती कन्या आहे. श्री तुळजाभवानी इंग्लिश मिडीयम स्कूलमधील शाळेतुन हे यश तीने प्राप्त केले आहे.

## समाजकल्याण विभागाकडून चर्मकार समाजावर अन्याय?

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ मे -**

समाजकल्याण विभागाकडून चर्मकार समाजावर सातत्याने अन्याय होत असल्याचा आरोप करत राष्ट्रीय चर्मकार महासंघ धाराशिव शाखेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. ही तक्रार जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मार्फत पाठविण्यात आली असून, समाजाच्या मूलभूत गरजांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.



राष्ट्रीय चर्मकार महासंघाची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

जिल्हाधिकाऱ्यांमार्फत देण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, समाजकल्याण विभागाच्या विविध योजना- शिष्यवृत्ती, विशेष घटक योजना, प्रशिक्षण योजना-या योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नसून, इतर समाजांपर्यंत तो मर्यादितपणे जात आहे. त्यामुळे चर्मकार समाजातील विद्यार्थी, बेरोजगार तरुण आणि कुटुंबांना याचा फटका बसत आहे.

महासंघाने यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना, उपमुख्यमंत्र्यांना व समाजकल्याण मंत्र्यांना निवेदन देऊन योग्य त्या उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. या निवेदनावर नितीन शेरखाने (प्रदेशाध्यक्ष), गणपत कांबळे (जिल्हाध्यक्ष), शांतीनाथ शेरखाने (जिल्हा सचिव), साहेबराव शेरखाने, संपत शेरखाने, शहाजी शेरखाने, माणिक डोलारे, बापू वाघमारे, प्रदीप भक्ते आदींच्या स्वाक्षरी आहेत.

## जुन्या महसूल अभिलेखांचे डिजिटायझेशन-'ई-रेकॉर्ड्स' प्रकल्पाच्या माध्यमातून नागरिकांसाठी उपलब्ध सेवा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ मे -**

'ई-रेकॉर्ड्स' हा राज्य शासनाचा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून,याअंतर्गत महसूल विभागाच्या अधिनस्त तहसील कार्यालयांतील फेरफार नोंदी,सातबारा उतारे,८ अ उतारे,खासरा पाहणी पत्रक,जुनी पाहणी पत्रके,कुळ नोंदणी पुस्तिका तसेच भूमी अभिलेख विभागातील सर्व जुने अभिलेख स्कॅन करून डिजिटायझेशन करण्यात येत आहे.

अभिलेखांची स्कॅनिंग व पडताळणी पूर्ण झाल्यानंतर त्यांचे **Bulk Signing** करून ते डिजिटली स्वाक्षरीत स्वरूपात नागरिकांना **https://dharashiv.maharashtra.gov.in/erecord/** या पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नागरिकांना हे अभिलेख ई-सुविधेच्या माध्यमातून, स्वतःची नोंदणी व मोबाईल ओटीपीच्या आधारे सहज पाहता येतात. जर संबंधित अभिलेखाची डिजिटली स्वाक्षरीत प्रत हवी असेल, तर पोर्टलवरील नियमानुसार ऑनलाईन शुल्क भरून ती प्रत प्राप्त करता येते. त्यांनी उपयुक्त योजनेचा लाभ घ्यावा व डिजिटल सेवांचा प्रभावीपणे उपयोग करावा. जिल्हा प्रशासनामार्फत नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे.

## इंदिरा विद्यालयाची विद्यार्थिनी आर्या शिंदेने ९५.४०% गुणांसह मिळवला प्रथम क्रमांक

**तभा वृत्तसेवा**
**मंगरुळ, दि.१६ मे -**

इंदिरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मंगरूळ तालुका तुळजापूर येथील विद्यार्थिनी आर्या अमोल शिंदे हिने ९५.४० टक्के गुण प्राप्त करत विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ दहावी बोर्ड परीक्षा (एसएससी) मार्च महिन्यात पार पडल्या असून त्याचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये आर्या शिंदे हिने सर्वच विषयात विशेष प्राविण्य मिळवले याची प्रचिती मला झाल्याचे प्रतिपादन आर्या शिंदे हिने सत्काराला उत्तर देताना केले. त्याच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक सुदर्शन शिंदे, जब्बार शेख, बालाजी डोंगरे, बंडू डोबाळे, चव्हाण, बालाजी गुरव, बनसोडे यांनी सत्कार केला व पुढील उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या

## माजी विद्यार्थ्यांचा ४१ वर्षांनी स्नेह मेळावा; जुन्या आठवणींना उजाळा, १०१ वृक्ष लागवडीचा संकल्प

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१६ मे -**

तालुक्यातील कसगी येथील श्री सिद्धेश्वर विद्यालयातील शै. वर्ष १९८३- ८४ मध्ये इयत्ता दहावी मध्ये शिकणारे माजी विद्यार्थी तब्बल ४१ वर्षांनी एकत्र येऊन आपल्या शालेय जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा देत पर्यावरण संतुलनासाठी शाळेच्या परिसरात १०१ वृक्ष लागवड करण्याचा संकल्प केला.

श्री सिद्धेश्वर विद्यालय कसगी येथे १९८३- ८४ बॅच च्या स्नेह मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी शिक्षण संस्थेचे सचिव विठ्ठलराव बदोले होते. मुख्य अतिथी म्हणून संस्था अध्यक्ष प्रा. विठ्ठलराव पटणे होते. माजी मुख्याध्यापक एस.व्ही.माने, ए.एम.पाटील, एस.आर.माशाळकर, आर.जी गोटूर, एम.जी.कलशेट्टी, एस.एम.यमगर, कल्याणी गुरव, मुख्याध्यापक आर.एम.माशाळे आदी मंचावर उपस्थित होते.



निर्मला नंदर्गे, उत्तम कांबळे, श्रीशैल बिराजदार, प्रमोद बदोले यांनी शालेय जीवनातील विविध प्रसंग सांगत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी संस्था अध्यक्ष प्रा.विठ्ठलराव पटणे व सचिव विठ्ठलराव बदोले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, माजी विद्यार्थ्यांनी समाजात आदर्श नागरिक म्हणून आपले कर्तव्य पार पाडावेत. विविध उपक्रमांच्या माध्यमातून शाळेचा व गावचा नावलौकिक करावा असे आवाहन केले. माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेच्या आजी-माजी शिक्षकांचा सत्कार करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक आर.एम.माशाळे यांनी केले. सूत्रसंचलन श्रीशैल बिराजदार यांनी तर आभार जीवन मोरे यांनी मानले. दुपारच्या सत्रात परिचय, वैयक्तिक व कौटुंबिक माहितीची देवाणघेवाण, वर्ग अनुभव, संगीत खुर्ची आदींसह विविध उपक्रम घेण्यात आले.

निर्मला नंदर्गे, शांता लोहार, हिरा जाधव, सिंधू गुरव, उदया जाधव, संगम्मा कुंभार, अनिता सुंठनुरे , कल्पना बदोले, अरुणा पोतदार, ललिता कलशेट्टी, अन्नपूर्णा बिराजदार, नारायण अंकुशे, मल्लिनाथ कारागीर, मधुकर बिराजदार, अंबादास बंदीछोडे, राघवेंद्र कुलकर्णी, प्रमोद शितोळे, संजय चव्हाण,

संगमेश्वर कांते, दिलीप कांबळे, दिंगबर बाभळसुरे, राजू सुरवसे, शंकर हळ्ळे, राम कुताडे, ज्ञानेश्वर माशाळे, प्रशांत चव्हाण, कल्याणी गुरव, संजय पाटील, प्रदीप पोतदार, गुंडू माने, धनराज पुजारी, साहेबराव नवले, धनराज मुगळे, प्रमोद बदोले, जीवन मोरे, विद्यमान मुख्याध्यापक आर.एम.माशाळे, उत्तम कांबळे, श्रीशैल बिराजदार आदी वर्ग मित्र-मैत्रिणींची उपस्थिती होती.

## डी.एल.एड.प्रवेश अध्यापक विद्यालयांची ऑनलाईन नोंदणी आवश्यक

**धाराशिव, दि.१६ मे -**

डी.एल.एड.(प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण) अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रथम वर्षाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेपूर्वी सर्व अध्यापक विद्यालयांनी ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करणे अनिवार्य आहे.ही नोंदणी प्रक्रिया १५ मेपासून ते २२ मेपर्यंत उपलब्ध राहणार आहे.

नोंदणीसाठी प्राचार्यांनी https://www.maa.ac.in या संकेतस्थळावर जाऊन Login वर क्लिक करावे. User ID व Password च्या साहाय्याने लॉगिन केल्यानंतर विद्यालयाची माहिती दिसेल.यातील Non Editable _m{hVr NCTE मान्यता पत्राशी सुसंगत आहे की नाही,याची खातरजमा करावी. तफावत असल्यास संबंधित पुराव्यासह supportdeledadmission.in या ईमेलवर माहिती पाठवावी. Editable माहिती अद्ययावत करून 'Save' करावी.

विहित कालावधीत नोंदणी न केल्यास संबंधित विद्यालयांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. नोंदणी प्रक्रियेसंदर्भात अडचण आल्यास जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धाराशिव येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे यांनी केले आहे.

## छत्रपती शिवाजी विद्यालय एस.एस.सी. परीक्षेत उज्ज्वल यश

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१६ मे -**

छत्रपती शिवाजी विद्यालय, वाशी या विद्यालयाचा एस.एस.सी. परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल ९२.१९ टक्के लागला आहे.

सदर परीक्षेत विद्यालयातून अर्जून उल्हास चेडे प्रथम गुण ४९६ टक्केवारी ९९.२०टक्के, पत्की ध्रुव सचिन व्दितीय गुण ४९४ टक्केवारी ९८.८० टक्के व मस्कर आर्या देविदास तृतीय गुण ४९३ टक्केवारी ९८. ६० टक्के. विद्यालयातून ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेणारे १५ विद्यार्थी आहेत. परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी १४१ त्यापैकी उत्तीर्ण विद्यार्थी १३०, विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण ५०, प्रथम श्रेणीमध्ये ३४. व्दितीय श्रेणीमध्ये ३७ तर पास श्रेणीमध्ये ९ विद्यार्थी आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी.वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी.टी. पाटील, जाईट सेक्रेटरी अरूण देवडवार, खजिनदार जयकुमार शितोळे व सर्व कार्यकारणी सदस्य, शालेय समिती चेअरमन तानाजी शिनगारे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष संदीप कवडे, शिक्षक-पालक संघ उपाध्यक्ष नेताजी नलवडे, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका एस. व्ही. गाढवे, पर्यवेक्षक बापूसाहेब सावंत, ग्रामस्थ, पत्रकार, शिक्षणप्रेमी नागरीक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## डॉ.आंबेडकर इंग्लिश स्कुलचा दहावी परीक्षेचा निकाल १०० टक्के

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ मे -**

नळदुर्ग येथील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मेडीयम स्कुलचा दहावी परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला असुन निकालामध्ये नळदुर्ग केंद्रात प्रथम येण्याचा मान सलग पाचव्यांदा या शाळेने मिळवुन आपली गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. या शाळेचे शंभवी बेंचमर्डीमठ ९६.४० व हजिफा शेख ९६.४० टक्के गुण मिळवत नळदुर्ग केंद्रात संयुक्तपणे प्रथम येण्याचा मान मिळविला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मारुती खारवे व शाळेच्या मुख्याध्यापिका कविता पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

शालांत माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचा (एसएससी) निकाल दि. १३ मे रोजी जाहीर झाला आहे. दहावी परीक्षेच्या निकालामध्ये याहीवर्षी अपेक्षेप्रमाणे मुलींनीच बाजी मारली आहे.

नळदुर्ग येथील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मेडीयम स्कुलचा दहावीच्या परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. या शाळेच्या ३७ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली होती. यापैकी सर्व ३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत विशेष म्हणजे या शाळेच्या विद्यार्थ्यांनी सलग पाचव्यांदा केंद्रात प्रथम येण्याचा मिळविला आहे.

या शाळेचे विद्यार्थी शंभवी बेंचमरडीमठ ९६.४० हजिफा शेख ९६.४० टक्के गुण मिळवत संयुक्तपणे नळदुर्ग केंद्रात प्रथम येण्याचा मान मिळविला आहे.

त्याचबरोबर स्वयंम पाटील ९६.२० %,शिवराणी कोरे ९६.२० %,साक्षी कांबळे ९६% ओम राठोड ९५.४०%, रोशिका हजारे ९५.४०%प्रतीक राठोड ९५.४०%, प्रसाद चिमणे ९५.२०%,

सलोनी कुलकर्णी ९४.४०%, कमल मेहराज ९४.४०%, हसीर काजी ९४%, शुभम राठोड ९३.८०%,संस्कृती सुरवसे ९३.६०%, ऋग्वेद पुदाले ९३.४०%, नीरज छत्रे ९३%गुण मिळविले आहे. या शाळेचे सर्वच विद्यार्थी विशेष प्राविण्यासाह उत्तीर्ण झाले आहेत.

## वीजवितरण कंपनीचा गलथान कारभार; विजपुरवठा वारंवार खंडीत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ मे -**

नळदुर्ग शहरात वीजवितरण कंपनी कार्यालयाच्या गलथान व भोंगळ कारभारामुळे शहराचा विजपुरवठा वारंवार खंडीत होत आहे याचा त्रास नागरीकांना होत आहे. वीजवितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ याची दखल घेऊन शहरातील विजपुरवठा सुरळीत करावा अन्यथा या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा माजी नगराध्यक्ष शहेबाज काजी यांनी दिला आहे.

सध्या अतिशय कडक उन्हाळ्याचे दिवस सुरु आहेत अशावेळी शहरात दररोज वारंवार वीज पुरवठा खंडीत होत आहे. यामुळे शहरातील नागरीक वैतागले आहेत. वीज वितरण कंपनीचा गलथान तसेच भोंगळ कारभार याला जबाबदार आहे. वीज पुरवठा खंडीत झाल्यानंतर नागरीक वीज वितरण कंपनीच्या कार्यालयात फोन करतात मात्र वीज वितरण कंपनीच्या कार्यालयातील फोन एक तर बंद असतो किंवा तो फोन कुणी उचलत नाही.रात्री अपरात्री दिवसा केंव्हाही विजपुरवठा खंडीत होत आहे असे शहेबाज काजी यांनी म्हटले आहे.

याठिकाणी कार्यरत असलेल्या वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्याचा येथील कर्मचाऱ्यावर कुठलाच वचक राहिला नाही.

त्यामुळे नळदुर्ग येथील वीज वितरण कंपनीच्या कार्यलयाचा कारभार सध्या रामभरोसे सुरु आहे मात्र याचा फटका वीज ग्राहकांना बसत आहे. याची दखल वीज वितरण कंपनीच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी घेऊन नळदुर्ग शहरातील वारंवार होत असलेला वीज पुरवठा खंडीत होण्याचा प्रकार तात्काळ बंद करून शहरात सुरळीत वीज पुरवठा करण्याचे आदेश येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांना द्यावेत अन्यथा याविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा माजी नगराध्यक्ष शहेबाज काजी यांनी दिला आहे.

## दोन विद्यार्थ्यांची इस्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ मे -**

येथील श्री राष्ट्रीय शिक्षण संस्था संचलित, स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर व महात्मा बसवेश्वार माध्यमिक विद्यालयातील दोन विद्यार्थ्यांची इस्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. उत्तुंगतेज फाउंडेशन मार्फत दरवर्षी घेण्यात येणाऱ्या उत्तुंग तेज बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षेचा निकाल १४ मे २०२५ रोजी जाहीर करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी व त्यांनी भविष्यात शास्त्रज्ञ बनण्याची स्वप्न बघावी या उद्देशाने उत्तुंगतेज फाउंडेशनचे संस्थापक रामेश्वर हलगे यांनी राज्यभर विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मला शास्त्रज्ञ व्हायचंय ही चळवळ सुरू केली आहे.





सालाबाद प्रमाणे याही वर्षी ही परीक्षा स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर मध्ये घेण्यात आली होती.

या शाळेतील अनेक विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्यातील संजीवनी श्रीकांत पाटील इयत्ता सहावी, महेश काशिनाथ बिराजदार इयत्ता आठवी या दोन विद्यार्थ्यांची इसरो अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल संस्थापक अध्यक्ष डॉ. चंद्रकांत महाजन, अध्यक्ष मल्लिकार्जुन दंडगे, कार्यवाह डॉ.कपिल महाजन, मुख्याध्यापिका सविता लोहार सह सर्व संचालक व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

## सावित्रीबाई फुले विद्यालयात गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१६ मे -**

शहरातील सावित्रीबाई फुले विद्यालयाचा दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल ९६ टक्के लागला .परीक्षेत एकूण बसलेले विद्यार्थी २३६ उत्तीर्ण विद्यार्थी २२६. विशेष प्राविण्य मिळवणारे विद्यार्थी ८७, प्रथम श्रेणी ६८, द्वितीय श्रेणी ५९, तृतीय श्रेणी १२ विद्यार्थी तसेच उच्च माध्यमिक विद्यालयाचा वाणिज्य शाखेचा निकाल ९७.५६%, कला शाखेचा निकाल ९०.६२%, विज्ञान शाखेचा निकाल १००% लागला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक तथाप्राचार्य काकासाहेब मुंडे तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष पांडुरंग भवर, सहसचिव भागवत सुरवसे,संचालक सूर्यकांत चव्हाण पालक प्रतिनिधी डॉ.सुनील थळकरी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ.मीनाक्षी शिंदे भवर, उपमुख्याध्यापक सोमनाथ सावंत, पर्यवेक्षक शंकर गोंदकर उपस्थित होते.

सत्कारमूर्ती मध्ये वाणिज्य शाखेचे ठोंबरे प्रगती ८८.५०% प्रथम, अडसूळ माधवी८०.८३% द्वितीय, बेडके निकिता७९.८३% तृतीय कला शाखेमध्ये करडे ऋतुजा ८५.३३%, कदम संकेत ७२.८३%, हजारे मानसी ६७.५०%, विज्ञान शाखेमध्ये सय्यद आयेशा ७१.५०%, यशवंत अनुजा ६९.५०%, कुंभार चैतन्य ६७.६७% यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. दहावी बोर्ड परीक्षेमध्ये यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला यामध्ये उपाडे प्रथमेश ९८.२० % प्रथम कातमांडे




व्यंकटेश ९५.४०%, द्वितीय निंबाळकर समृद्धी ९५.२०%, तृतीय थळकरी गार्गी ९४.६०%, भवर पियुष ९३%, गोडगे आदिती ९२.६०%, घुले वैष्णवी ९२.४०%, कुलकर्णी ऋतुजा ९१.६०%, शेख सिमरन ९०.८०%, कणसे चैतन्य ९०.८०%, तांबोळी सनोबर९०.६०%, वाघमारे अथर्व ९०.६०%, वाघमारे सृष्टी ९०.४०%, महाकुंडे आदित्य९०.४०%, शेवडे श्रुती ८९.८०%, माळी संकीता८९.६०%, गव्हाणे श्रावणी ८९.४०%, चोंदे प्रतीक्षा ८९.२०%, जाजू पृथ्वीराज ८९%, गव्हाणे यशराज ८८.८०%, रामेश्वरऋतुजा८८.८०%, मोहिते वैष्णवी ८८.८०%, देशमुख संयुक्ता ८८.८०% इटकर श्रावणी८८.६०%, वाघमोडे आकांशा ८८.६०% चोंदे पियुष ८८.४०%, मुळे वेदिका ८८%, नाईकवाडे अस्मिता ८७.८०%, वाकडकर ऋतुजा ८७.४०%, गायकवाड श्रेया ८७.२०%, कुपकर श्रावणी८६.६०%, जमाले प्रांजली ८६.४०%, परकाळे ओंकार८६.२०%, कदम प्रतीक्षा ८५.६०% खंदारे जानवी ८५% कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक शंकर गोंदकर यांनी केले सूत्रसंचालन परमेश्वर मोरे व सूर्यभान सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन जीवनसिंह ठाकुर यांनी मानले यावेळी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# केजमध्ये कंटेनरने अनेकांना चिरडले
## चार ठार अनेकजण जखमी



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ मे**
मांजरसुंबा येथून केज आणि लोखंडी सावरगाव पर्यंत एका भरधाव कंटेनरने आज दुपारी अनेकांना धडका देता गेला असून यामध्ये आतापर्यंत चार जण ठार तर २५ नागरिक जखमी झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. यामुळे या रस्त्यावर या कंटेनरच्या थरार मुळे अंगावर काटा आल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. हा कंटेनर लोखंडी सावरगाव येथे पलटी झाल्याने पुढे घडणार अनर्थ टळला आहे.

आज शुक्रवारी दुपारी मांजरसुंबा येथून केज कडे येत होता. या कंटेनरने केज शहरात शिक्षक कॉलनी ते धारुर चौक दरम्यान अनेकांना धडक दिली. तो नथांबता हळीं रपव ींप तसाच निघून गेला पुढे चंदन सावरगाव जवळही या कंटेनरने धडक दिली. पुढे कंटेनर आणि मागे माणसं रक्ताच्या थारोळ्यात पडलेले होते. हे दृश्य पाहून अनेकांचा थरकाप उडाला असून, या अपघातात चारजण ठार झाल्याची भीती व्यक्त केली जात असून २५ जण जखमी झाले आहेत. तर हा कंटेनर चालक मांजरसुंबा येथेही धडकून आल्याचे सांगितले जात आहे. तर लोखंडी सावरगाव येथे कंटेनर पलटी झाल्याने पुढे घडणारा अनर्थ टळला आहे. केजमध्ये आज आठवडी बाजार असल्याने या रस्त्यावर जास्त गर्दी असल्याने कंटेनर खाली आली.



## भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ तिरंगा रॅलीत परळीकरांचा उत्स्फूर्त सहभाग
### माजी सैनिकांचा सन्मान,श्रध्दांजलीनंतर राष्ट्रगीताने समारोप

परळी (प्रतिनिधी)–भारतीय सैन्य दलाने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानला मात देत दाखवलेल्या अतुलनीय शौर्याला सलाम करण्यासाठी परळी येथे पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे व मा. खासदार प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.देशभक्तीच्या जयघोषात परळीकरांनी या रॅलीत उस्फुर्तपणे सहभाग नोंदवला.मोंढा मैदान येथे पाच माजी सैनिकांचा सन्मान, शहीदांना श्रद्धांजली व राष्ट्रगीताने तिरंगा रॅलीचा समारोप झाला.

# वाहतूक शाखेच्या पोलिस नारायण दराडे यांनी रस्त्यावर सापडलेले पॉकेट केले परत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ मे**



शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी नारायण दराडे व राहुल घाडगे कार्यरत असताना त्यांना एक पॉकेट सापडले त्यात पंधरा हजार व गाडीची कागदपत्र सापडले. कागदपत्राचे आधारे संबंधित व्यक्तीचा पत्ता काढून पैसे व पॉकेट त्यांनी परत करत आज ही माणुसकी जिवंत असल्याचे दाखवून देतो.

सध्याच्या परिस्थितीमध्ये माणुसकी जिवंत नसल्याचे अनेक उदाहरणे समोर येत आहे परंतु आजही माणसातील माणुसकी जिवंत असल्याने काही चांगल्या घटना समोर येत असताना दिसत आहेत कर्मचारी असो की सामान्य नागरिक असो नैतिकता असेल तर समाजात चांगला मेसेज जाण्यास उशीर होत नाही अशीच घटना शहरात वाहतूक शाखेच्या पोलिसां संदर्भात घडून आली आहे. काही दिवसा पूर्वी एका गाडीमध्ये अडीच लाख सापडले असता सदर व्यक्तीला सर्वच रक्कम वाहतूक शाखेच्या अमलदाराने सन्मनाने परत केली. ही घटना ताजी असतानाच पोलीस हेडकॉन्स्टेबल नारायण दराडे, पोलीस अमलदार राहुल घाडगे हे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथे कर्तव्य बजावताना त्यांना एक पाकीट मिळून आले. त्यामध्ये पंधरा हजार रुपये रोख, गाडीचे आरसी बुक लायसन्स, आधार कार्ड, बँकेचे एटीएम व फोटो असे पाकीट मिळून आले. त्यांनी आरसी बुक वरून गाडीचा नंबर शोधला व गाडी डिवाइस मध्ये सर्च केली. गाडी ऑनलाईन असल्यामुळे फोन नंबर अपडेट होता. सदर अमलदारांनी त्या पॉकेट मालकाला फोन करून साठे चौक या ठिकाणी त्याचे पाकीट सन्मानाने परत केले. अशा काही घटनांवरूनच समाजात आजही माणुसकी जिवंत असल्याचे दिसून येत आहे वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी नारायण दराडे व राहुल घाडगे यांचे समाजातून कौतुक होत आहे.

# परळी नगर परिषदच्या स्वच्छता विभागाकडुन
# मान्सुन पुर्व स्वच्छता कामांना वेग
## शहरातील मोठ्या नाल्यांची साफसफाई सुरू, नागरीकांनी सहकार्य करावे - मुख्याधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१६ मे**



शहरात मान्सून पुर्व स्वच्छता कामा बाबत परळी नगर परिषद अक्शन मोडवर आली आहे. स्वच्छतासह मोठ्या नाल्यांची साफसफाई मोहिम सुरू झाली आहे. नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन, कचरा आणि गाळ नाल्यात टाकू नये, जेणेकरून पावसाळ्यात पाणी व्यवस्थित रस्ता मिळवू शकेल आणि शहरात पूर येण्याची शक्यता कमी होईल. परळी नगर परिषदेच्या स्वच्छता विभागाकडुन मान्सुन पुर्व स्वच्छता कामांना गती देण्यात आली आहे. जे.से.बी., ट्रॅक्टर आदी मशनरीसह स्वतंत्र मजुरांची नियुक्ती करुन साफसफई करण्यात येत आहे. यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे यांनी केले आहे.

शहरात पावसाळापूर्व स्वच्छता कामाना गती दिली आहे. शहरात अनेक ठिकाणी नाल्यांमध्ये पाणी साचल्यामुळे पूर परिस्थिती निर्माण व्हायची आशा ठिकाणी स्वच्छता सुरू करण्यात आली आहे. नगरपरिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे क्शन मोडर आले आहेत. मान्सून पूर्व शहरातील नाले सफाईवर प्रशासनाने जोर दिला आहे. शहरातील अनेक नाल्यांमध्ये गाळ काढण्याचे काम व सफाई नगर परिषदद्वारे करण्यात येत आहेत. नगर परिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, उपमुख्यधिकारी संतोष रोडे व स्वच्छता विभाग शंकर साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता विभागातील विलास केदारी, सुरेश वाल्मिकी, राजाभाऊ जगतकर, राजाभाऊ गायकवाड, जेसीबी चालक सिद्धार्थ कसबे, धनराज कसबे व सर्व अधिकारी आणि कर्मचार्यांच्या सहकार्याने पावसाळापूर्व कामे हाती घेण्यात आली आहेत. पावसाळ्यात शहरातील मोठे नाले आणि नाल्या तुंबून रस्त्यावर पाणी येणार नाही. नागरीकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची खबरदारी घेणार असल्याचे मुख्याधिकारी यांनी सांगितले. शहरातील उखळवेस ते सिमेंट फेक्ट्ररी, सरस्वती नदी गोपाळ टॉकीज ते सार्वजनिक समशान भूमी मलिकपुरा, पंचायत समिती नाथ रोड ते घरणीकर रोड, घरणीकर रोड ते हमालवाडी, साई नगर, सोमेश्वर नगर ते शारदा नगर, काळरात्री मंदिर ते घनशी नदी तसेच विविध भागातील नाल्या यासह शहरातील विविध छोट्या मोठ्या नाल्यांमधील गाळ व कचरा काढण्यात येत आहे. यासाठी दोन जेसीबी, सहा ट्रॅक्टरद्वारे व कर्मचार्यांच्यासह्याने साफसफई करण्यात येत आहे. पावसाळा सुरु होई पर्यन्त ही साफसफाई करण्यात येणार असुन या काळात शहरातील ज्या नाल्या तुंबल्या आहेत. त्यातील गाळ काढण्यात येणार आहेत. नागरिकांनी त्यांच्या परिसरातील स्वच्छता राखण्यासाठी योगदान देणे आवश्यक आहे. तसेच, कचरा व्यवस्थापनाच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. नागरिकांनी नाल्यांमध्ये कचरा आणि गाळ टाकू नये. तसेच, नाल्यांच्या परिसराची स्वच्छता राखण्यासाठी सहकार्य करावे व नागरिकांनी आपला कचरा घंटागाडी मध्ये टाकावा असे आवाहन परळी नगर परिषदच्या स्वच्छता विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# माजी सैनिकांचा सन्मान करुन रणवीर पंडित यांचा वाढदिवस साजरा होणार
## रक्तदान शिबीरासह विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ मे**



शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक रणवीर अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय सैन्य दलातुन निवृत झालेल्या माजी सैनिकांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. माजी सैनिकांचा सन्मान करुन रणवीर पंडित यांचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा होणार असल्यामुळे तरुणांमध्ये या निमित्ताने राष्ट्रप्रेम जागृत करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. शनिवार दि. १७ मे रोजी सकाळी ११ वाजता गेवराई शहरातील कृष्णाई निवासस्थानी मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी निवृत सुभेदार कॅप्टन रामकृष्ण चेडे, डॉ. मयुर सोनवणे, बळीराम गवते, अजिंक्य आनेराव यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. रक्तदान शिबीर, पेढे तुला, सामान्य ज्ञान स्पर्धा आदी समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी युवकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन शारदा स्पोर्ट्स अकॅडमीच्या माध्यमातुन करण्यात आले आहे.

गेवराई तालुक्यातील माजी सैनिकांचा भव्य सन्मान करुन शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक रणवीर अमरसिंह पंडित यांचा आगळावेगळा वाढदिवस साजरा होणार आहे. पहलगाम घटनेनंतर भारतीय सैन्याने केलेल्या कामगिरीचा प्रत्येक भारतीयांना अभिमान असुन भारतीय सैन्य दलातील जवानांप्रती आदरभाव निर्माण झाला आहे. या पार्श्वभुमीवर माजी सैनिकांचा सन्मान करुन वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय शारदा स्पोर्ट्स अकॅडमी व रणवीर पंडित मित्र मंडळाने घेतला आहे. शनिवार दि. १७ मे रोजी सकाळी ११ वा. गेवराई शहरातील कृष्णाई निवासस्थानी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी निवृत सुभेदार कॅप्टन रामकृष्ण चेडे, छत्रपती संभाजीनगर राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष डॉ. मयुर सोनवणे, बीड पंचायत समितीचे माजी सभापती बळीराम गवते, राष्ट्रवादी विद्यार्थी कॉँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अजिंक्य आनेराव यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात गेवराई तालुक्यातील माजी सैनिकांचा सन्मान केला जाणार आहे. कृष्णाई येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. मौजे मादळमोही येथे जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक राजेंद्र वारंगे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकारातुन शनिवार दि. १७ मे रोजी सकाळी १० वा. रणवीर पंडित यांची भव्य पेढेतुला होणार आहे. गेवराई शहरातील मोहसिन शेख यांच्या पुढाकारातुन भव्य सामान्य ज्ञान स्पर्धा आणि सायंकाळी गेवराई शहरात वाढदिवसानिमित्त ठिक–ठिकाणी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आलेले आहे. कृष्णाई येथे आयोजित केलेल्या माजी सैनिकांच्या सन्मान सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन शारदा स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने करण्यात आले आहे.

# जात प्रमाणपत्र पडताळणी सूचना


**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ मे**
राज्याती ल सध्या सुरू असलेल्या सन २०२४–२०२५ मधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी (अभियांत्रिकी वैद्यकीय आणि इतर व्यवसायि क अभ्यासक्रमा सहित) एसईबीसी व ओबीसी प्रवर्गाती ल जे उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत परंतु विहित कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकलेले नाहीत. अशा उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय दिनांक २ मे २०२५ अन्वये शासन आदेशाच्या दिनांक पासून अधिक ३ महिन्याचा कालाव धी देण्यात आलेला आहे. आधीकचा ३ महिन्याचा कालावधी हा एसईबीसी व ओबीसी प्रवर्गाती ल ज्या उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहे परंतु जात वैधता प्रमाणपत्र विहित वेळेत सादर करू शकले नाहीत अशा उमेदवारासाठीच राहील. या आधीच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकले नाहीत अशा उमेदवारांचे प्रवेश होऊ न शकल्यास त्यास संबंधित उमेदवार जबाबदार राहतील असे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.या आधीच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकले नाहीत अशा उमेदवारांचे प्रवेश होऊ न शकल्यास त्यास संबंधित उमेदवार जबाबदार राहतील असे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# कु.अदिती धोंडजीचा सीबीएसई दहावी परीक्षेत देशात डंका
## प्रा.गंगाधर शेळके सर यांच्या नातीने देशात दुसरी तर महाराष्ट्रात पहिला येण्याचा मिळविला बहुमा

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१६ मे**
केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या निकालात संभाजीनगर येथील वुडरीज स्कूलची आदिती मधुकर धोंडजी या विद्यार्थिनीने ५०० पैकी ४९९ गुण घेत सीबीएसई बोर्डात देशात दुसरा क्रमांक पटकावला आहे. आदिती धोंडजी ही जागृती मल्टीस्टेटचे चेअरमन प्रा. गंगाधर शेळके सर यांची नात आहे. डॉ. मधुकर धोंडजी व अश्विनी धोंडजी यांची मुलगी आदितीने अभ्यासाच्या जोरावर मिळविलेल्या अफलातून यशाबद्दल तिचा सन्मान स्कूलचे प्राचार्य श्रीहरी बाबू यांनी केला.

छत्रपती संभाजीनगर शहरातील ६७ पेक्षा अधिक शाळा सीबीएसई बोर्डाला संलग्न आहेत. दहावीच्या परीक्षेला शहरातून ५ हजार २५७ विद्यार्थी बसले होते. त्यातील बहुतांश विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या विद्यार्थ्यांमध्ये वूडरीज स्कूलची आदिती धोंडजी हिने ५०० गुणांपैकी ४९९ गुण घेतले आहेत. त्यात तिने इंग्रजी, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्रे या विषयात १०० पैकी १०० गुण घेतले आहेत. तसेच हिंदी विषयात ९९ गुण घेत राष्ट्रीय पातळीवर दूसरे स्थान पटकावल्याचेही प्राचार्य श्रीहरी बाबू यांनी सांगितले.

सीबीएसई परीक्षेत १०० पैकी १०० टक्के घेणारा एकमेव विद्यार्थी उत्तर प्रदेशचा असून, आदिती धोंडजी सह ओडिशाच्या एका विद्यार्थ्यास संयुक्तपणे ४९९ मार्क मिळाले आहेत. त्याशिवाय मागील अनेक




वर्षात राज्यातील कोणत्याही विद्यार्थ्यांने राष्ट्रीय पातळीवर अशा पद्धतीचे यश मिळविले नसल्याचेही प्राचार्य श्रीहरी बाबू यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. आदितीने मिळविलेल्या यशाबद्दल जागृती नागरी पतसंस्था, जागृती मल्टीस्टेटचे चेअरमन प्रा. गंगाधर शेळके सर, प्रा. शोभाताई शेळके मॅडम,

सर्व संचालक मंडळ, पिग्मी एजंट यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

देशात दुसरी येण्याचा पराक्रम

इयत्ता दहावीच्या सीबीएसई परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेत अदिती धोंडजी या विद्यार्थिनी देशात दुसरा क्रमांक महाराष्ट्रातून पहिला येण्याचा बहुमान मिळवला आहे. आदितीचे वडील डॉ. मधुकर आणि आई डॉ. अश्विनी याच्या उपस्थितीत शाळेचे अध्यक्ष दीपक कोठारी, प्राचार्य श्रीहरी बाबू यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी आदितीने राष्ट्रीय पातळीवरील जेईई परीक्षेची तयारी करण्याचा निर्णय घेतला आहे.

# छत्रपती संभाजीराजे जयंती निमित्त रक्तदान शिबिर



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१६ मे**
स्वराज्यासाठी स्वतःचे बलिदान देणारे स्वराज्याचे दुसरे छत्रपती आणि आजच्या तरुण पिढीचे खरे आदर्श,छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधत तालुक्यातील मौजे कौडगाव हुडा येथील सामाजिक कार्यकर्ते दत्ताभाऊ गव्हाणे व मित्रपरिवार यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान शिबिरामध्ये पंचक्रोशीतील एकूण चोवीस ( २४ ) रक्तदात्यांनी स्व:ईच्छेने रक्तदान केले.रक्तदान शिबीराची सुरुवात ग्रामपंचायती समोर असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.सकाळी ९:३० ते दुपारी एक या वेळेत हे रक्तदान शिबिर पार पडले.तरुणांनी निर्व्यसनी राहत समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अश्या प्रकारचे आगळेवेगळे शिबिरं आयोजित करण्याची आवश्यकता असल्याची भावना यावेळी अनेक उपस्थित मान्यवरांनी बोलून दाखवली.रक्तदान शिबिर घेण्यासाठी आलेल्या स्वराती ग्रामीण रुग्णालयातील रक्तपेढी टीमचे नेतृत्व श्री.चव्हाण यांनी केले व ईतर डॉक्टर मंडळींनी रक्तदान करवून घेतले.रक्तदान शिबिरामध्ये सहभाग नोंदवल्या बद्दल शेवटी दत्ताभाऊ गव्हाणे यांनी गावकऱ्यांच्या वतीने सर्वांचे आभार मानले.